**( सभापती स्थानी : माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.**: सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

( चर्चा पुढे सुरु )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या आसनाजवळ खाली बसलेले असतात.)

**उपसभापती** : आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा तिसरा व शेवटचा दिवस आहे. माननीय वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी एक तासाचा वेळ असेल बाकीच्या चर्चेसाठी असलेल्या वेळेपैकी निम्मा वेळ सत्ताधारी पक्षासाठी व निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांसाठी देण्यात आला आहे. ज्या सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपापली नावे पक्ष प्रतोदांमार्फत द्यावीत. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, सभागृहामध्ये आपल्याला बसण्यासाठी चांगली व्यवस्था केली असताना सुध्दा आपण आसनाजवळ खाली का बसलेला आहात ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, कालच माननीय राज्यपालांनी शासनाला विनियोजन विधेयक मांडण्यासाठी अनुमती दिली होती. अगोदर विनियोजन विधेयक कार्यक्रमपत्रिकेवर दाखवण्यात आले होते, त्यावेळी माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी विनियोजन विधेयक मांडण्यासाठी आपल्याला थांबवले असल्याचे सांगितले. याबाबत राज्यात गेल्या चार दिवसांपासून संभ्रम निर्माण झाला होता. माननीय राज्यपालांनी, शासनाला विनियोजन विधेयक सभागृहामध्ये मांडण्यासाठी थांबवावे. अशी घटना याच वर्षी घडली आहे. अशी घटना इतिहासात यापूर्वी कधीही घडलेली नाही. माननीय राज्यपालांनी विनियोजन विधेयक मांडण्यासाठी परवा संध्याकाळी जी परवानगी दिली त्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्तमंत्री हे माननीय राज्यपालांना भेटण्यासाठी गेले होते, त्यावेळी माननीय राज्यपालांनी 1041 कोटी रुपयांचा जो विषय होता, या निधीचे वाटप कशा पध्दतीने करावयाचे यासंबंधी काय निदेश दिले ? काही अटी टाकल्या आहेत काय ? या संदर्भात आज अनेक वर्तमानपत्रांमध्ये वेगवेगळया प्रकारच्या बातम्या आल्या आहेत. तसेच खानदेशसाठी 385 कोटी रुपये दाखवण्यात आले होते त्यापैकी केवळ 100

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

कोटी रुपये द्यावेत एवढेच सांगण्यात आले आहे. म्हणून या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला तर आम्हाला सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेता येईल. अन्यथा जोपर्यंत याबाबतचा खुलासा होत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेणार नाहीत, हा आमचा अधिकार आहे. या संदर्भात माननीय राज्यपालांनी शासनाला जे काही लेखी दिले असेल ते या सभागृहाला समजले पाहिजे, सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेला समजले पाहिजे. अन्यथा माननीय राज्यपालांनी शासनाला काय सांगितले, कोणत्या अटींवर विनियोजन विधेयक मांडण्यासाठी परवानगी दिली, कोणत्या अटीवर निधीचे वाटप करण्यासाठी सांगितले आहे अशाप्रकारचे सर्व प्रश्न अनुत्तरीत राहणार आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा खुलासा होणे अत्यावश्यक आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, माननीय राज्यपाल यांच्याकडे घटनात्मक जबाबदा-या आहेत. जे अविकसित भाग आहेत, त्यासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. या सर्व वैधानिक विकास मंडळांना निधी देण्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी आणि मंत्रिमंडळ मागासलेल्या भागांना न्याय देऊ शकलेले नाही, त्यांचा विकास करु शकलेले नाही.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. सांगळे नंतर --- 11:05

श्री.विलासराव देशमुख ....

म्हणून आम्ही आमच्या सभागृहाचे अधिकार आणि मंत्रिमंडळाचे देखील सगळे अधिकार हे माननीय राज्यपाल महोदयांना दिलेले आहेत. त्यामुळे घटनेच्या 371(2) कलमामध्ये जी व्यवस्था आहे त्याप्रमाणे तुम्ही राज्यातील या सगळ्या भागांना पैशाचे समान न्यायी वाटप करा अशा प्रकारची विनंती आम्हीच राज्यपाल महोदयांना केलेली आहे. त्यामुळे पैशाचे, निधीचे न्याय्य वाटप त्या त्या भागाला होते आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्यपाल महोदयांची आहे. म्हणून जेव्हा आपण या संबंधात 1,041 कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडल्या आणि विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी त्या मान्य केल्यानंतर त्याबाबतचे विनियोजन विधेयक मांडण्याची वेळ आली तेव्हा माननीय राज्यपालांच्या लक्षात आले की, हे पैशाचे वाटप करताना काही भागांकडे जास्त पैसा दिला गेला आहे किंवा काय हे आपण पाहिले पाहिजे. म्हणून त्यांनी ते विधेयक रोखले. मग त्या संदर्भात मी स्वत: जाऊन तसेच माननीय वित्तमंत्र्यांनी देखील राज्यपाल महोदयांशी चर्चा केली, पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी देखील त्याबाबत आपली बाजू त्यांचेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच हेही त्यांच्या लक्षात आणून दिले की, यातून घटनात्मक पेच निर्माण होण्याची शक्यता आहे तरी आपण आम्हाला हे विधेयक मांडण्यास अनुमती द्यावी. त्याप्रमाणे मग त्यांनी आपल्याला हे विधेयक मांडण्यास मान्यता दिली आणि कालच हे विनियोजन विधेयक विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालेले आहे. सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्र किंवा तापी खोरे यासाठी त्यामध्ये जे 385 कोटी रूपये आपण मंजूर केले होते ते पैसे उत्तर महाराष्ट्र वा तापी खोऱ्यासाठीच खर्च झाले पाहिजेत अशी चर्चा खालच्या सदनामध्ये काल आणि आज देखील झाली. माननीय राज्यपालांच्या कानावर आम्ही ही चर्चा घातली. कारण उत्तर महाराष्ट्र भागातील काही प्रकल्प अर्धवट आहेत आणि त्यामुळे तेथील लोकांच्या भावना देखील या संदर्भात तीव्र आहेत. तेव्हा माननीय राज्यपालांनी सांगितले की, त्या भागासाठी जे 385 कोटी रूपये दिलेले आहेत त्यापैकी 100 कोटी रूपये खर्च करावेत. अर्थातच निधीचा खर्च कसा आणि किती करावा हे सांगण्याचा अधिकार माननीय राज्यपालांचा आहे आणि त्यामुळेच त्यांनी या वर्षी तसेच पुढील वर्षी किती आणि कसा खर्च करावा हे आपल्याला सांगितले आहे. तेव्हा 385 कोटी रूपये तापी खोऱ्यासाठी मंजूर आपण केलेले असताना त्यापैकी या वर्षी 100 कोटी रूपये आणि उरलेले 285 कोटी रूपये पुढील वर्षामध्ये खर्च करण्यास त्यांनी मान्यता दिली आहे. विदर्भ, मराठवाड्याच्या

..... बी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

संबंधात मात्र कोठलाही बदल त्यांनी सुचविला नाही. थोडक्यात सांगावयाचे तर यावर क्लोज मॉनेटरींग करण्याची पावले त्यांनी आता उचलली आहेत व तो त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करीन की, आता हा विषय चर्चेतून जवळपास संपुष्टात आलेला आहे. तरी त्यांनी सभागृहाच्या कामकाजास सहभागी होऊन अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घ्यावा आणि त्यांच्या मनात अजूनही जे काही प्रश्न असतील ते या चर्चेमध्ये आपल्याला जरूर उपस्थित करता येतील. तेव्हा भारतीय जनता पक्ष तसेच शिवसेना या पक्षाच्या सदस्यांना माझी विनंती राहील की, त्यांनी सभागृहाच्या कामकाजामध्ये नेहमीप्रमाणे भाग घ्यावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये आणखी एक प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. खानदेश तथा तापी खोऱ्यामध्ये या वर्षी 100 कोटी रूपये खर्च करावेत असे माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्याला सुचविले आहे आणि 400 कोटी रूपये विदर्भ-मराठवाडा तसेच कोकणाला देवून उरलेले 400 कोटी रूपये राहतील ते राज्यपालांच्या संमतीशिवाय खर्च करू नयेत असेही सुचविले आहे हे खरे आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले ते सत्य आहे. केवळ खर्च कसा करावा याबद्दल राज्यपाल महोदयांनी सूचना अवश्य दिलेल्या आहेत आणि त्याचे संबंधित विभागाकडून पालन होईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर अशा प्रकारची बाब आहे. राज्यपाल महोदयांचे ते अधिकार आहेत याबद्दल दुमत नाही. परंतु सतत व्हायोलेशन असल्यामुळे तो नियम व्हायला पाहतो आहे. ज्याची अर्जन्सी आहे, सर्वांच्या मनामध्ये, विशेषत: खानदेशातील लोकांच्या मनामध्ये ज्या भावना निर्माण झालेल्या आहेत त्याचे देखील उत्तर ताबडतोब येणे म्हणूनच आवश्यक आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... सी 1 ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

सभापती महोदय,परिस्थिती अशी आहे की, खानदेशाचा अनुशेष 1994 मध्ये होता त्यामध्ये वाढ झाली आहे ही गोष्ट असत्य नाही. माझ्याजवळ त्यासंबंधीची असलेली आकडेवारी मी वाचून दाखवीत नाही. एक गोष्ट सांगू इच्छितो की, कधीही अनुशेषामध्ये नव्हता तो जळगाव जिल्हा जून 2004 च्या सरासरीमध्ये अनुशेषामध्ये आला. त्यांना निधी फार कमी दिला गेला ही वस्तुस्थिती आहे. उर्वरीत महाराष्ट्रासाठी प्रचंड मोठया प्रमाणात व्हायोलेशन करुन माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे मोठा निधी मिळाला. सन 2002-03 मध्ये 894 कोटी मिळावयास हवे होते त्याऐवजी 1193 कोटी मिळाले. सन 2003-04 मध्ये 834 कोटी मिळावयास हवे होते त्याऐवजी 1272 कोटी मिळाले. आणि सन 2004-05 मध्ये 396 कोटी मिळावयास हवे होते त्याऐवजी 1245 कोटी मिळाले. यामधील वाटप सुध्दा त्यातील मागासलेल्या जिल्हयांमध्ये निदेशाप्रमाणे झाले नाही. त्यांना कमी निधी मिळाला हे काही बरोबर झाले नाही.म्हणून त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. आणि म्हणून एखाद्या विभागाला लाथेखाली तुडविले जाणे ही गोष्ट बरोबर नाही. महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक घटना आहे. आणि म्हणून त्या बाबतीत सभागृहामध्ये निवेदन होणे आवश्यक आहे. शासनाकडून अधिकृतपणे सदनापुढे ती गोष्ट आली पाहिजे. पूर्वीच्या सरासरीमध्ये जळगाव जिल्हा कधीही अनुशेषामध्ये नव्हता तो जून 2004 च्या सरासरीमध्ये अनुशेषात आला आणि त्या जिल्हयामध्ये 9.26 हजार हेक्टरचा अनुशेष निर्माण झाला. हा अनुशेष कां वाढतो? त्या जिल्हयासाठी द्यावयाच्या निधीचा गळा धरला जातो त्यावेळी हा अनुशेष वाढत जातो हे त्याचे कारण आहे. दांडेकरांनी आपल्या अहवालामध्ये वापरलेले वाक्य असे आहे की, "नुसत्या डोळयांनी अनुशेष दूर होणार नाही. निधीचा गळा मोकळा केला पाहिजे तरच हा अनुशेष दूर होईल. नियमाप्रमाणे चालण्याची पहाट कधी तरी उगवू द्या, तुमच्यासमोर महाराष्ट्राचा इतिहास आहे". खानदेशाच्या मंडळींनी जी गोष्ट काल सांगितली ती गांभीर्याने घेतली पाहिजे. आणि म्हणून मला वाटते की, आपण या ठिकाणी अर्थसंकल्पावर चर्चा करीत असलो तरी या बाबतीत स्पष्ट भूमिका घेऊन शासनाने सभागृहासमोर येण्याची आवश्यकता आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी उपस्थित केलेला मूलभूत मुद्दा योग्य आहे. यामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे की, मधल्या काळात प्रत्येक विभागनिहाय वैधानिक विकास मंडळे नेमण्यात आली. त्याचबरोबर पाटबंधारे विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी विभागवार सिंचन विकास महामंडळे निर्माण करण्यात आली. त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

29-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) C 2

DGS/ KGS/ MAP/ 11:10

श्री. विलासराव देशमुख...

पश्चिम महाराष्ट्रासाठी कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ नेमले, तापी खोरे सिंचन विकास महामंडळ, कोकण सिंचन विकास महामंडळ, गोदावरी सिंचन विकास महामंडळ आणि विदर्भासाठी सुध्दा सिंचन विकास महामंडळ नेमण्यात आले. अशाप्रकारची चार-पाच महामंडळे नेमल्यानंतर त्यावरील शासनाचे नियंत्रण गेले. मंडळाला देण्यासाठी शासनाकडे निधी नव्हता म्हणून मंडळांनी बाजारातून रोख्याव्दारे निधी उभा करुन त्या पध्दतीने खर्च करण्याचे ठरविले. त्यामुळे त्यांच्यामध्ये एकप्रकारची स्पर्धा सुरु झाली. आणि म्हणून शेवटी ही गोष्ट लक्षात आली की, यामध्ये मोठया प्रमाणात डिस्टॉर्शन झाले. ज्या भागाला जेवढा निधी मिळाला पाहिजे त्यापेक्षा अधिक निधी दिला गेला. याबाबतची आकडेवारी आपल्याकडे आहे, ती गोष्ट मी नाकबूल करणार नाही. आणि म्हणून माननीय राज्यपालांना हस्तक्षेप करावा लागला. एका भागाला निधी दिला जात असतांना दुसऱ्या भागावर अन्याय होत असल्याचे दिसून आले. आपण फक्त विभागाचा अनुशेष काढला आहे, अजून आपण तालुकावार अनुशेषापर्यंत पोहोचलेलो नाही. विदर्भातील अनुशेषाचा विचार केला तर अमरावती जिल्हयामध्ये सर्वात कमी अनुशेष आहे. आपण ज्या जिल्हयातून आला आहात त्या जिल्हयाची आकडेवारी जरी सांगितली नसली तरी ती आकडेवारी आमच्याकडे आहे. आणि म्हणून विदर्भाचा विचार करीत असतांना नागपूर, भंडारा, गोंदीया या जिल्हयामधील अनुशेष देखील अजून दूर झालेला नाही. म्हणून नवीन सुधारीत प्रकल्पनिहाय प्रत्येक जिल्हयाला किती निधी मिळाला आहे याची माहिती काढून यापुढील काळात क्लोज मॉनिटरींग व्हावे आणि ते बजेटमध्ये रिफ्लेक्ट व्हावे.

(यानंतर श्री. किल्ल्ेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

कारण शेवटी वैधानिक विकास मंडळाला दिलेला पैसा आहे, तो त्या भागाला मिळाला पाहिजे. कोणते प्रकल्प त्या पैशातून घेतलेले आहेत ? ते घेत असतांना तेथील जिल्ह्यावर अन्याय झालेला आहे काय ? आम्ही फक्त पश्चिम महाराष्ट्र महाराष्ट्र म्हणून..कृष्णा खोरे म्हणून पैसे देणार आणि तापी खोऱ्यावर अन्याय होणार किंवा कोकणावर अन्याय होणार. मराठवाड्यामध्ये एकच मंडळ आहे, परंतु विदर्भामध्ये आठ जिल्ह्ये आहेत, त्यांचे क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे त्या भागावरही अन्याय होणार. म्हणून या पुढच्या काळामध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी याबाबतची अंमलबजावणी कशी केली पाहिजे, कशाप्रकारे पैसा खर्च झाला पाहिजे आणि त्या त्या स्तरावर ही जबाबदारी फिक्स करता आली पाहिजे, अशाप्रकारचे पाऊल उचललेले आहे. मला असे वाटते की, यामुळे निश्चितपणाने कोणताही पैसा कोठेही सहजपणे आपल्याला वळविता येणार नाही. त्यासाठी प्रोसिजर आणि प्रोसेसमधून जावे लागेल. मला असे वाटते की, माननीय राज्यपाल महोदय, नवीन पध्दती स्वीकारु इच्छितात. त्यामुळे जे डिस्टॉर्शन वाढले, ते कमी करण्याचा पुढचा भाग आहे. पण नव्याने पुन्हा आणखी बॅकलॉग निर्माण होणार नाही, हेही त्यातून निष्पन्न होईल. आता आपल्याला विभागवार बॅकलॉगच्या ऐवजी पुढच्या काळामध्ये तालुका पातळीवर नेमकी परिस्थिती काय आहे ? याचाही अभ्यास करावा लागेल आणि त्या दिशेने राज्य सरकार पाऊल उचलणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय....

**उपसभापती** : मी एक मिनिट बोलतो. खरे तर आता आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे करतो आहोत...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागासलेल्या भागावर...

**उपसभापती** : मी आपल्याला बोलण्यास परवानगी देतो, परंतु माझे बोलणे पूर्ण झालेले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे निवेदन केले, त्यावर भाष्य करायचे नाही असे म्हणत असाल तर मी खाली बसतो.

**उपसभापती** : कृपया माझे पूर्ण ऐकून घ्यावे. आपण उठून उभे राहिला, मी आपल्याला बोलण्यासाठी संधी दिल्यानंतर त्याबाबत ताबडतोब माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. त्यानंतर या संदर्भात आपण निवेदन करायला सांगितले, मला वाटते की, शासनामार्फत ते निवेदन योग्य वेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**उपसभापती** (पुढे सुरु...

येईल. आता विषय अर्थसंकल्पावरील चर्चेचा आहे. आज चर्चेचा तिसरा दिवस आहे. जे आपल्यासमोर कामकाज आहे त्याबाबत मी बोलून दाखविले.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे आपण बोला, आम्ही बसून रहातो.

**उपसभापती** : मी आपल्याला विनंती करतो की,माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत सभागृहात निवेदन केले जाईल,असे सांगितले. त्यानंतरही त्यांनी आपल्याला विनंती केली की, त्यावेळी आपण बोलावे.

श्री.अरविंद सावंत : एखाद-दुसरा मुद्दा राहिला असेल तर सन्माननीय श्री.रावते साहेबांना आपण बोलू द्यावे.

**उपसभापती** : मी एक गोष्ट निदर्शनास आणून दिली...

श्री.दिवाकर रावते : मला बोलायचे आहे.

**उपसभापती** : ठीक आहे, आपण बोला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रथमतः शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा नित्त्याचा कार्यक्रम आहे, त्याबाबत बोलतो. श्री.पुंडलिक दिवाजी खंडाळे, रा.उसळ, ता.कळंब,जि.यवतमाळ आणि श्री.वासुदेव महादेव राऊत, रा.फाळा ता.मोर्शी, जि.अमरावती या दोन शेतकऱ्यांनी आता आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 407 झाली आहे. आताच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, सिंचनाच्या अनुशेषासंबंधी जे काही होत आहे, झाले आहे, त्यात सुधारणा करू. यासंबंधीचा अधिकार हा माननीय राज्यपालांना आहे. काल येथे माननीय राज्यपालांचे नवीन निदेश पाठविण्यात आले आहेत. त्यात या शासनाने त्यांचे आदेश स्पष्टपणे धुडकावून लावले आहेत त्याबाबत त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे. या आदेशात असे म्हटले आहे की, "The Directives envisaged tha the backlog in the Irrigation Sector as of 1st April,2002 would be liquidated in a time frame of four years ending 31st March,2006." 2006 पर्यन्त बॅकलॉग पूर्ण करा, अशाप्रकारचे त्यांनी डायरेक्टीव्हज दिले होते. As per the formula prescribed by the Directives, the Governor, every year indicated the minimum allocation for the Irrigation Sector and its apportionment amongst the three regions. However, there has been an obvious mismatch..."मिसमॅच" अशाप्रकारचा शब्द वापरलेला आहे. सरकारने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

जी मिस्चीफ चार वर्षामध्ये केली, त्याला "मिसमॅच" असा शब्द वापरलेला आहे."In the allocations prescribed by the Directives....डायरेक्टीव्हज पायदळी तुडविले. हा शुध्द मराठीचा चांगला अनुवाद इंग्रजीमध्ये करुन येथे सांगितलेले आहे. Further it is stated that: "And the actual expenditure in the past three years, details of which are specified at Annexure II. Consequently, even after issue of the Directives for three consecutive years, the backlog till March 2005 in the Irrigation Sector has been reduced by only 21.30%."

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

Sir, it is further stated that: "Table at Annexure III indicates the comparative position of financial backlog in Irrigation Sector." सभापती महोदय, माननीय राज्यपाल आपल्या पत्रामध्ये पुढे असे म्हणत आहेत की, "....This situation of backlog still continuing despite the Directives of the Governor..." माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश आपण वारंवार पायदळी तुडवित आहात असे माननीय राज्यपाल आपण वितरित केलेल्या पुस्तिकेत डायरेक्ट म्हणत आहेत आणि ते सभागृहाच्या पटलावर आलेले आहे. जनाची नाही तर मनाची म्हणतात ती तरी या सरकारला वाटते काय ? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की," This situation of backlog still continuing despite the Directives of the Governor, has necessitated a review and issue of a fresh set of Directives." त्यांनी अगतिकतेने असे म्हटले आहे की, मी दिलेले आदेश सतत धुडकावणाऱ्या सरकारने मला नवीन निर्देश देण्याची पाळी आणलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, अमूक झाले. काल आम्ही एवढाच प्रश्न विचारला होता की, माननीय राज्यपालांनी विनियोजन बिलावर सही करताना तुम्हाला काही पत्र दिले आहे काय ? तुम्हाला काही निर्देश दिले आहेत काय ? तुम्हाला पत्रातून आणखी काही सांगितले आहे काय ? काही अटी घातलेल्या आहेत काय ? मला सांगताना खेद होतो की, या सदनामध्ये काल आम्ही बहिर्गमन केल्यानंतर माननीय वित्त मंत्र्यांनी सांगितले की, असे कोणतेही पत्र दिलेले नाही. म्हणजे सदनामध्ये सुध्दा दिशाभूल करण्याचे काम चालूच आहे. सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी अत्यंत महत्वाचा विषय मांडला. त्यांनी सांगितले की, खान्देशचा अनुशेष 2004 मध्ये वाढलेला आहे. तो अनुशेष का वाढला ? माननीय राज्यपालांनी सन 2003-04 ची आकडेवारी दिलेली आहे. त्यामध्ये विदर्भाचा शॉर्टफॉल 579.07 कोटी रुपयांचा आहे, मराठवाड्याचा शॉर्टफॉल 305.76 कोटी रुपयांचा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 299.06 कोटी रुपये जास्त उचलले. ते पैसे आपण खान्देशसाठी का वापरले नाहीत ? सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख असे म्हणाले की, तुम्ही निधीचा गळा घोटत आहात. निधीच्या घोटलेल्या

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते .....

गळ्यातून जे रक्त विदर्भ आणि मराठवाड्यातून ओकले ते पैसे खानदेशसाठी, त्या अविकसित भागासाठी का वापरले नाहीत ? हा जो प्रश्न आहे त्याचे उत्तर मिळत नाही. त्याचे उत्तर माननीय राज्यपालांनी आता निधी देताना सांगितले. विनियोजन विधेयक मंजूर झाले आहे, पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या आहेत आणि 263 कोटी रुपयांचे वाटप आता कायद्याने व्हावयास पाहिजे. राज्यपालांनी मग ते अडविले आणि त्यांनी सांगितले की, त्यातील फक्त 100 कोटी रुपयेच खान्देशला देता येतील. बाकीच्या पैशाचे 31 मार्चपर्यंत काय करणार हा प्रश्न आता निर्माण तर झालेला आहेच पण याही परिस्थितीमध्ये सातत्याने मराठवाडा आणि विदर्भाचा निधी पळवावयाचा, तो निधी उर्वरित महाराष्ट्राच्या नावाने पश्चिम महाराष्ट्रात वापरावयाचा ही जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याचा खुलासा अजून होत नाही. माननीय राज्यपालांनी जे पत्र दिलेले आहे ते पत्र त्यांनी सरकारला दिलेले आहे. ती कोणाची खाजगी प्रेम प्रकरणाची बाब नाही. त्यामुळे ते देता येणार नाही असे म्हणता येणार नाही. म्हणून त्या पत्राचा मजकूर आम्हाला पटलावर मिळावा अशी आमची काल पासून मागणी आहे. कायदेशीरपणे काम करा असे निर्देश माननीय राज्यपाल या सरकारला देत आहेत ते तरी सभागृहाच्या पटलावर आले पाहिजे. सरकारने सातत्याने घटना पायदळी तुडवली. घटनात्मक अधिकार पायदळी तुडवले माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश पायदळी तुडवले. माननीय राज्यपाल त्यामध्ये सहभागी नाहीत हे समजण्यास आम्हाला दुसरा मार्ग नाही. म्हणून माननीय राज्यपालांच्या सचोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी सरकारला सचोटीने वागण्यास सांगितले आहे तेवढी माहिती आम्हाला मिळाली पाहिजे ही कालपासूनची आमची भूमिका आहे. म्हणून आमची ही निदर्शने चाललेली आहेत. त्याकरिता आपणही निदेश द्यावेत. ते पत्र काय आहे ते आम्हाला उपलब्ध करुन द्यावे एवढीच आमची विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एक मुद्दा मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. माननीय राज्यपालांनी काल विनियोजन बिलाला परवानगी दिली त्याबरोबर त्यांनी काही पत्र दिले आहे काय ? त्यांनी तुम्हाला काही सांगितले आहे काय ? असे आम्ही काल या सभागृहामध्ये विचारले. माननीय वित्त मंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, असे काही दिलेले नाही. मला आठवत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. नितीन गडकरी ....

नाही. आज टाइम्स ऑफ इंडियापासून सर्व वर्तमानपत्रामध्ये ते प्रकाशित झालेले आहे. याचा अर्थ माननीय राज्यापाल आणि सरकार यांच्यामधील पत्रव्यवहार सरकारमधून बाहेर लिक केला जातो. आम्हाला ते वर्तमानपत्रातून कळत आहे. आपण आजची सगळी वर्तमानपत्रे काढून बघा. त्यामध्ये त्यांनी काय झाले ? कोणाचे पैसे कमी केले ? कोणाचे पैसे वाढवून दिले ? काय सांगितले ? यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल काय सर्टिफिकेट दिलेले आहे ? ते दिलेले आहे. ते सर्व आम्ही वर्तमानपत्रातून वाचावयाचे. माननीय श्री. अण्णा हजारे यांच्या म्हणण्यानुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी आग्रहाने माहितीच्या अधिकाराचा कायदा पास केला. माहितीचा अधिकार मान्य झाल्यानंतर अशा प्रकारे राज्याच्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबतचे जे पत्र आहे ते सरकारला मिळाले की नाही ? डायरेक्शन्स मिळाल्या की नाही ? ते काय म्हणाले ? हे देखील कोणी सांगावयास तयार नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:25

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये बसलेले असतात.)

(श्री. नितीन गडकरी ...)

माननीय राज्यपालांनी जे काही सांगितलेले आहे ते आम्हाला वर्तमानपत्रातून समजणे कितपत योग्य आहे ? सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. या सार्वभौम सभागृहामध्ये आम्हाला माहिती मिळणार नाही, ती मागण्याचा आम्हाला अधिकार नाही, ती माहिती आम्ही वर्तमानपत्रातून मिळवायची असे आपण आम्हाला सांगणार काय ? सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी शासनाला दिलेले पत्र लिक झालेले आहे. वर्तमानपत्रातून त्याबाबतीत छापून आलेले आहे. तर मग वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी चुकीची आहे असा सरकारने खुलासा करावा. यामुळे या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. या सार्वभौम सभागृहातील सन्माननीय सदस्यांना जी माहिती मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. परंतु ती माहिती वर्तमानपत्रातून मिळते. ही माहिती सन्माननीय सदस्यांना न देणे ही अतिशय गंभीर गोष्ट असून याबाबतीत सभापती महोदय, आपण रुलिंग द्यावे. माननीय राज्यपालांनी शासनाला दिलेले पत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे आदेश आपण शासनाला द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे. सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहाची प्रतिष्ठा लक्षात घेता, आपल्या पदाची प्रतिष्ठा लक्षात घेता या सभागृहातील लोकप्रतिनिधींच्या लोकशाही अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. हे सरकार जसा विचार करते तसा विचार आपण कधीच करणार नाही. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या हक्कांचे रक्षण करुन आपण या सभागृहाचे कामकाज चालविता. सभापती महोदय, मी आपला उल्लेख "रामशास्त्री प्रभुणे" असा केलेला आहे. आपली प्रतिष्ठा कायम राहावी, आपला सन्मान कायम राहावा, असे आम्हाला वाटते. आपल्या हातून कधीच अनुचित प्रकार घडणार नाही असा आम्हाला विश्वास आहे. म्हणून माननीय राज्यपालांनी शासनाला जे पत्र दिलेले आहे ते पत्र या सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे आदेश आपण शासनाला द्यावेत अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. दैनिक "टाइम्स ऑफ इंडिया" या वर्तमानपत्रामध्ये आलेला खुलासा मी आपणास वाचून दाखवितो. "Governor clears Bill, albeit conditionally. Surprisingly, for the past three year, there has been gross disparity in allocation of funds.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी....)

This was evident from a letter written by the Governor's Secretary Jayakar Jerome. It was pointed out in the letter that for the financial year 2002-2003 against a provision of..."'

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. अनुशेषाच्या संदर्भात बोलण्यासाठी सन्माननीय विरोधी पक्षनेते उभे राहिल्यानंतर मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील आपले विचार मांडले. माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या काही गोष्टी घडलेल्या आहेत त्याची पूर्ण कल्पना दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी निवेदन करण्याची मागणी केल्यानंतर ते निवेदन योग्य वेळी करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा विषय सभागृहासमोर असल्यामुळे विषयाला सोडून दुसरीकडे जाऊ नये, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेऊन आपण आपले विचार मांडावेत अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन आपापल्या जागेवर बसावे अशीही मी त्यांना विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे मार्गिकेमध्ये बसलेले सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. अरविंद सावंत : आम्ही विषय सोडलेला नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे सभागृह सुरु झाल्यानंतर आज वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या छापून आलेल्या आहेत त्यासंदर्भातील एक साधा विषय आम्ही सभागृहामध्ये सांगितला. माननीय राज्यपाल महोदयांनी विनियोजन विधेयकावर सही करताना सरकारला जे पत्र दिले ते पत्र या सभागृहाच्या पटलावर ठेवावे अशी आम्ही काल पासून आग्रहाची मागणी करीत आहोत. ते पत्र वर्तमानपत्रातून छापून येते, मात्र या सार्वभौम सभागृहातील सन्माननीय सदस्यांना ते मिळत नाही, ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी असे सांगितले की, अशा प्रकारचे कोणतेही पत्र माननीय राज्यपालांनी दिलेले नाही. म्हणजे या सभागृहाची सरळ सरळ दिशाभूल केली जात आहे. माननीय राज्यपालांनी दिलेले पत्र या सभागृहाच्या पटलावर ठेवावे एवढाच आमचा आग्रह आहे. ते पत्र जोपर्यन्त सभागृहाच्या पटलावर ठेवले जात नाही तोपर्यन्त आम्ही सभागृहाच्या कोणत्याही कामकाजामध्ये भाग घेणार नाही. माननीय राज्यपालांनी दिलेले पत्र मागण्याचा आमचा

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

अधिकार आहे. आमच्या अधिकारांची गळचेपी होणार असेल, अशा पध्दतीने या शासनाची दादागिरी चालणार असेल तर आम्ही सभागृहाच्या कोणत्याही कामकाजामध्ये भाग घेणार नाही.

...नंतर श्री. कानडे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे अर्थसंकल्पावरील भाषण सुरु करतील.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, विदर्भ,मराठवाडा आणि खानदेशातील जळगांव,नंदुबार व धुळे या तीन जिल्हयांमध्ये सिंचनाचा जो अनुशेष आहे त्याचे वाटप करताना सर्व प्रकारच्या नियमांचे आणि संविधानिक तरतुदींचे अध:पतन झाल्याची भावना विरोधी पक्षाच्या अनेक माननीय सदस्यांनी व्यक्त केली त्या भावनेशी सहमती दर्शवून सन्माननीय वित्त मंत्र्यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली 2006-07 या वर्षासाठीचा जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्या अर्थसंकल्पावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात बसून घोषणा देत असतात )

सभापती महोदय, 2006-07 या वर्षासाठीचा जो अर्थसंकल्प सादर करण्यात आला तो 8479.04 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर झाला आहे. विदर्भ,मराठवाडा व खानदेशामध्ये सिंचनाचा जो अनुशेष आहे त्या संदर्भात सिंचनासाठी निधीचे वाटप करताना ज्या पध्दतीने पक्षपात करण्यात आला त्याबाबतीत अनेक माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अर्थसंकल्पावर बोलत असताना या भावनेशी सहमती व्यक्त करीत असताना माझे भाषण शांतपणे ऐकून घेतले तर बरे होईल असे मला वाटते. 2006-07 या वर्षासाठीचे 8479.04 कोटी रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये तुटीचे अंदाजपत्रक सादर करणे हा एक महत्वाचा भाग समजला जातो. अनेक प्रकारचे विकासाचे प्रकल्प,विदर्भातील सिंचनाचे प्रकल्प,मराठवाडयातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील जळगांव,धुळे आणि नंदुरबार या जिल्हयातील सिंचनाचे प्रकल्प आज प्रलंबित असताना शिलकी अंदाजपत्रक सादर करणे हे प्रगतीशील आणि कल्याणकारी राज्याला योग्य दिसत नाही असे मला वाटते. कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडताना उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल तर ते योग्य समजले जात नाही. चूक समजले जाते. या राज्यामध्ये अनेक प्रकारच्या विकासाच्या योजना राबवीत असताना जर उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला तर उचित मानले जाते. राज्यात आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक,औद्योगिक,सांस्कृतिक अशा अनेक प्रकारच्या समस्या असताना देखील 8479.04 कोटी रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक आहे ही बाब अभिनंदनीय आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

प्रा. जोगेंद्र कवाडे ........

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये खऱ्या अर्थाने आमच्या राज्यातील मानवी विकासाचा चेहरा दिसून येतो असे असले तरी त्यात मानवतेचा आविष्कार प्रतिबिंबीत व्हावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. या राज्याचे देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत रु. 32170 रुपये एवढे असून महाराष्ट्र राज्य हे विविध मंडळाद्वारे गुंतवणूकीयोग्य राज्य या स्तरापर्यंत त्यात सुधारणा झालेली आहे त्यात गुंतवणूक योग्य असा पतरोख्यांच्या पतदर्जामध्ये यापुढेही वाढ होईल अशी मी आशा करतो. शासनाने नाबार्डच्या माध्यमातून राज्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याचा प्रयत्न केला तसेच शेतकऱ्यांना कमी दराने व्याज पुरवठा करण्याचा जो निर्णय घेतला त्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, अर्थसंकल्पातील काही महत्वाच्या मुद्दयांकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मुख्यत: या शासनाने अनुसूचित जाती आणि नवबौध्दांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांच्या मुला-मुलींसाठी स्वयंसेवी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी 100 निवासी शाळा सुरु करण्याचा मनोदय अर्थसंकल्पाच्या माध्यमातून व्यक्त केला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मागासवर्गीय मुला-मुलींसाठी वेगळया 100 वस्ती शाळा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द तसेच भूमिहीन शेतमजूरांच्या कुटुंबियांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून 4 एकर कोरडवाहू आणि 2 एकर ओलिताची जमीन खरेदी करण्यासाठी शासनामार्फत 50 टक्के कर्ज आणि 50 टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्याची योजना आहे.......

( विरोधी पक्षाचे माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना वारंवार विनंती करुनही ते सभागृहात शांतता ठेवत नाहीत, म्हणून मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 11 वाजून 38 मिनिटांपासून सकाळी 11.43 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जे पत्र वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले आहे, ते मागण्याचा आमचा अधिकार आहे.

**उपसभापती** : यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी संपूर्ण खुलासा केलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले अर्थसंकल्पावरील भाषण सुरू करावे.

(गोंधळ)

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभपती महोदय, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या भागांवर अन्याय झालेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांवरसुध्दा प्रचंड अन्याय करण्यात आलेला आहे. अनुसूचित जातीच्या मुलांसाठी 100 निवासी शाळा सुरू करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची 9 टक्के व अनुसूचित जातीची 11 टक्के एवढी असल्याने अर्थसंकल्पामध्ये त्याप्रमाणात तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि, या वर्षीच्या अर्थसंकल्पात या समाजासाठी अनुक्रमे फक्त पावणेसात टक्के व आठ टक्के तरतूद करण्यात आल्याचे दिसून येते. अशाच प्रकारचा अन्याय इतर मागासवर्गावरसुध्दा करण्यात करण्यात आलेला आहे. मागच्या वर्षी मंत्रिपरिषदेने 387 निवासी शाळा अनुसूचित जातीकरिता मंजूर केल्या होत्या. परंतु, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये केवळ 100 निवासी शाळांची तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना 2004 पासून सुरु करण्यात आली आहे. परंतु या योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द, भूमिहीन शेतमजूरांना 4 एकर कोरडवाहू व 2 एकर ओलीताखालील जमीन खरेदी करण्यासाठी शासनामार्फत 50 टक्के कर्ज व 50 टक्के अनुदान देण्याची योजना असताना सुध्दा अद्यापपर्यंत कोणालाही जमीन देण्यात आलेली नाही. त्यामुळे या जमिनी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्यांशी निगडीत असलेली "चरित्र प्रकाशन ग्रंथ समिती" ही अत्यंत महत्वाची समिती आहे. परंतु या समितीसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या संदर्भात सरकारने विशेष काळजी घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो. शेवटी पुन्हा एकदा या अर्थसंकल्पाचे समर्थन करतो व माझे दोन शब्द पुरे करतो.

धन्यवाद !

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, मुझफ्फर हुसेन, सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान, सन्माननीय सदस्य सर्वश्री रमेश निकोसे, प्रा. शरद पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी भाग घेतल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

महोदय, सरकारने जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्यावरुन राज्याची कशा प्रकारे विशेष प्रगती झालेली आहे हे आपल्या सर्वांच्या निदर्शनास येईल. सहा वर्षांपूर्वी राज्य सरकारतर्फे श्वेतपत्रिका मांडण्यात आली होती. श्वेतपत्रिकेच्या पार्श्वभूमीवर त्यावेळी सभागृहात असे भाष्य केले हाते की, राज्याची आर्थिक दुरुस्ती करुन दाखवू, तसेच राज्यासमोरील आर्थिक विकास वाढीचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न करु. मला अतिशय समाधान वाटते की, सहा वर्षानंतरच्या कालखंडात मी या वर्षी सहावा अर्थसंकल्प मांडलेला आहे. या राज्यातील जमा आणि खर्च याचे प्रमाण समतोल राखण्याचा आम्ही यशस्वी करु शकलो आहोत. वारंवार आम्हाला या राज्यासमोरील कर्जाचा जो मुलभूत प्रश्न आहे त्याबाबत विचारले जायचे. या राज्यावर कर्ज किती आहे ? राज्यासमोर जो कर्जाचा डोंगर आहे त्याचे काय करणार आहात ? अशा प्रकारचे प्रश्न वारंवार विचारले जात असत. परंतु महोदय, मला सांगताना आनंद होत आहे की, या साऱ्या प्रश्नांची उत्तरे या अर्थसंकल्पामध्ये देण्यात आलेली आहेत. या देशातील सगळया राज्यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला तर, देशातील प्रत्येक राज्यावर जे कर्ज आहे, ते त्या राज्यांच्या सकल उत्पन्नाच्या किती टक्के आहे, याची आकडेवारी लक्षात घेण्यासारखी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळी....

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

श्री. जयंत पाटील ....

सभापती महोदय, देशामध्ये अशी अनेक राज्ये आहेत, ज्यांच्या विकासाचा वेग वेगवेगळा आहे. बिहार राज्यावर त्यांच्या सकल उत्पन्नाच्या 94 टक्के कर्ज आहे. देशातील सर्व राज्यांची तुलना केली तर आपल्याला असे दिसून येईल की, महाराष्ट्र राज्यावरील सकल उत्पन्नाच्या कर्जाच्या टक्केवारीचे प्रमाण कमी झालेले असून ते प्रमाण आता आम्ही 30 टक्क्यांवरुन 28 टक्क्यांवर आणलेले आहे. राज्यावरील कर्जाच्या बोजाची टक्केवारी कमी झालेली आहे. महाराष्ट्र राज्य देशातील एक सबल राज्य म्हणून आर्थिक परिस्थितीत पुढे यायला लागलेले आहे. सभापती महोदय, या राज्यामध्ये फिस्कल डेफिसिट वाढत आहे अशी आपण चर्चा करायचा. येथे सन्माननीय सदस्य काही घोषणा देत आहेत. सभापती महोदय, त्यांच्या राजवटीमध्ये राज्याचे फिस्कल डेफिसिट एवढे वाढले की, राज्य अडचणीत आले. आता ती परिस्थिती आम्ही बदलली असून फिस्कल डेफिसिट टू जी.डी.पी चा असणारा हा आकडा साडे चार, पाचवरुन 4, 3, 3.9 असा खाली आलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये आपल्याला दिसून येईल की, फिस्कल डेफिसिट टू जी.डी.पी. ची टक्केवारी 1.8 एवढी खाली आलेली आहे. एवढ्या प्रमाणात फिस्कल डेफिसिट खाली आल्यामुळे आता राज्याच्या अर्थसंकल्पावर काय चर्चा करायची असा सन्माननीय सदस्यांना प्रश्न पडलेला आहे आणि म्हणून वेगवेगळ्या माध्यमातून अर्थसंकल्पावरील चर्चा टाळण्याचा येथे उपद्व्याप चाललेला आहे. सभापती महोदय, मी समजू शकतो की, आपल्या गत काळातील काही गोष्टी लपविण्यासाठी अशाप्रकारे वेगवेगळे मार्ग अवलंबिले जातात. गेल्या सहा वर्षांपासून सन्माननीय सदस्य एकाच मुद्याचा उल्लेख करत आहेत. मला त्या विषयी काहीही बोलायचे नाही. आपण या बाबतीत काय करणार ? सभापती महोदय, मला आपल्याला नम्रपणे एवढेच सांगावयाचे आहे की, राज्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे वचन आम्ही महाराष्ट्रातील जनतेला दिलेले आहे. राज्य शासनाने आर्थिक परिस्थितीबाबत ज्या काही दुरुस्त्या केल्या आहेत, त्या दुरुस्त्यांमुळे राज्याच्या विकास वाढीची गती वाढल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, मधल्या काळामध्ये राज्याच्या विकास वाढीचा वेग चार टक्क्यांपर्यंत खाली गेलेला होता. राज्याच्या विकास वाढीचा तो





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

वेग वाढविण्याचे आम्ही महाराष्ट्रातील जनतेला वचन दिलेले होते. सभापती महोदय, आता हा विकास वाढीचा वेग 7 ते 7.5 टक्क्यांवर गेलेला आहे. आपण अर्थसंकल्प पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, देशाच्या विकास वाढीचा वेग 8.1 टक्के असला तरी महाराष्ट्र राज्याच्या विकास वाढीचा वेग 8.6 टक्क्यांवर गेलेला आहे. सभापती महोदय, आम्ही फक्त एवढ्यावरच समाधानी नाही. आम्हाला राज्याच्या विकास वाढीचा वेग 9 ते 10 टक्क्यांवर कसा जाईल हे पहावयाचे आहे. म्हणून राज्याच्या विकास वाढीसाठी असलेल्या गोष्टींचा आम्ही सर्वकषपणे अंमल करुन विकास वाढीचा वेग वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहे. सभापती महोदय, राज्याच्या विकास वाढीचा वेग वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अर्थसंकल्पामध्ये देखील उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड साहेबांनी काल काही विषयांचा उल्लेख केला.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 11:55

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

श्री. जयंत पाटील....

त्यांच्या सर्व सूचनांचा विचार करण्यात येणार आहे. जकातीला पर्याय शोधण्याबाबत त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केलेला आहे, जकातीला पर्याय शोधण्याचा प्रयत्न शासनातर्फे करण्यात येत आहे. त्याच बरोबर आय.टी. सेक्टरकडे लक्ष द्यावे अशीही सूचना त्यांनी मांडलेली आहे. या देशामध्ये आय.टी.सेक्टरमध्ये सर्वात जास्त गुंतवणूक ही महाराष्ट्रा राज्यामध्ये होत आहे. महाराष्ट्र शासनाचे त्याकडे पूर्ण लक्ष आहे. सन्माननीय सदस्य श्री. आव्हाड यांनी अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत. एनयूआरएम मध्ये त्यांनी ठाणे जिल्हयाच्या संदर्भात भूमिका मांडली. या संदर्भात निश्चितपणाने एनयूआरएम या केंद्र सरकारच्या योजनेचा फायदा आपल्या राज्यात करण्यासाठी आपण यासाठी 1100 कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केलेली आहे. आपला प्रयत्न असा आहे की, ग्रेटर मुंबई हे विकास वाढीचे एक मोठे क्षेत्र करावे, आणि म्हणून ठाणे, वसई, विरार, भाईंदर असेल, सभापती महोदय, आपण ज्या भागातून येतात त्या सगळया भागाचा विकास वाढविण्यासाठी सरकार लक्ष केंद्रीत करीत आहे. यासंदर्भातील उल्लेख अर्थसंकल्पामध्ये आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी देखील काही मौलिक सूचना केलेल्या आहेत, सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी कल्चरल पॉलिसी असावी अशी एक चांगली सूचना केलेली आहे. कल्चरल पॉलिसी करण्याच्या संदर्भात राज्य सरकार निश्चितपणे लवकरात लवकर विचार करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुझफफर हुसेन यांनी अशी सूचना केलेली आहे की, शाळेत जाणाऱ्या मुलांच्या दप्तराच्या ओझ्याचा बोजा कमी करावा. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मराठवाडयाच्या संदर्भात हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्सच्याबाबतीत मौलिक विचार मांडलेले आहेत. मराठवाडयाचा हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स कमी आहे, उत्तर महाराष्ट्राचा कमी आहे, विदर्भातील यवतमाळ व त्या विभागाचा कमी आहे, तेथील हयुमन डेव्हलमेंट इंडेक्स सुधारण्यासाठी सरकारने प्रयत्न करण्याचे ठरविलेले आहे. सन्माननीय सदस्यांकडून अनेक महत्वाचे विषय या ठिकाणी मांडण्यात आलेले आहेत. सभापमी महोदय, मला आपल्या मार्फत एवढेच सांगावयाचे आहे की, या राज्य सरकारने जाणीवपूर्वक अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

.....2....

29-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

श्री. जयंत पाटील....

विरोधी पक्षाचे सदस्य जे आता आरडाओरड करीत आहेत त्यांच्याच काळात अनुशेष वाढलेला आहे. अनुशेष वाढविण्याचे पाप त्यांनी केलेले आहे. मराठीमध्ये अशी एक म्हण आहे,मी विरोधी पक्षाच्या सदस्यांना म्हणत नाही. पण "अमुक अमुक चोराच्या उलटया बोंबा " अशी ती म्हण आहे. यापेक्षा या संदर्भातील वर्णन मला करता येत नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान व सन्माननीय सदस्य डॉ. अझिज यांनी अल्पसंख्याकांच्या संदर्भातील महत्वाच्या सूचना येथे केलेल्या आहेत. ज्या नव्या योजना आहेत, त्यांच्याच उल्लेख आपण अर्थसंकल्पामध्ये केलेला आहे. ज्या रेग्युलर योजना आहेत त्यांचा मुद्दाम अर्थसंकल्पामध्ये उल्लेख केलेला नाही. असे केले असते तर अर्थसंकल्पाचे भाषण दोन तासांऐवजी अडीच ते तीन तास चालले असते. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी वाईनच्या संदर्भात सूचना केलेली आहे. 20 टक्के जो टॅक्स आहे तो 4 टक्के करावा, त्यासंदर्भातील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल. महाराष्ट्र पुन्हा एकदा आर्थिक बाबतीत मूळ पदावर रुळावर आलेला आहे. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती आता सक्षम झालेली आहे, पाटबंधारे प्रकल्पांसाठी अधिकाअधिक पैसा खर्च करुन जो अनुशेष आहे तो लवकरात लवकर दूर करण्याची कार्यवाही राज्य सरकार करणार आहे. परंतु कोणाच्यातरी सांगण्यावरुन ते करणार नाही तर स्वइच्छेने राज्य सरकार करणार आहे. सभापती महोदय, विरोधी पक्षाकडे दुसरे काही आता राहिलेले नाही म्हणून हे आता व्यक्तिपर्यंत त्यांची घसरण झालेली आहे. विरोधी पक्षाची घसरण राज्याच्या प्रश्नावरुन विभागाकडे आणि विभागाकडील प्रश्नांवरुन व्यक्तिपर्यंत आलेली आहे. कृपा करुन ही घसरण सन्माननीय सदस्यांनी घालवावी. विरोधी पक्षनेते पद गेल्यावर इतके चिडून आपला तोल घालविणे बरोबर नाही. आपले जरी विरोधी पक्षनेते पद गेलेले असले तरी आमच्या मनात तुमच्याबद्दलचा जो आदर आहे तो कायमच आहे, आपण आपला गैरसमज करुन घेऊ नका...

यानंतर श्री. सांगळे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.जयंत पाटील ....

मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, आता आपण विरोधी पक्षनेते पदी नसताना सुध्दा विरोधी पक्षनेते पदावर आक्रमण करुन या ठिकाणी जे नेतृत्व करीत आहात, ही बाब योग्य नाही. हा अधिकार माननीय विरोधी पक्षनेता यांचा आहे, याबाबत आपण माननीय विरोधी पक्षनेत्यांना संधी देणे आवश्यक आहे. अशाप्रकारे माननीय विरोधी पक्षनेत्यांना मागे ठेऊन, विनाकारण असे वर्तन करुन राज्यातील जनतेच्या मनात वेगवेगळे संभ्रम निर्माण करणे हे चूकीचे आहे, हा उद्योग आपण थांबवावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, मला थोडया वेळापूर्वी " सौ चूहे खाकर बिल्ली हज़ को चली " ही म्हण लक्षात येत नव्हती. सन 1996 ते 1999 या काळामध्ये विदर्भामध्ये रस्त्यांचा, पाटबंधा-यांचा सर्वात मोठा अनुशेष कुणी निर्माण केला असेल तर तो म्हणजे या राज्यामध्ये असलेल्या श्री.नितीन गडकरी नावाच्या गृहस्थांनी केला आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी मंत्रिमंडळामध्ये असताना, राज्यामध्ये कृष्णा खो-याची कामे सुरु असताना, त्यावेळी राज्यात निर्माण झालेल्या अनुशेषाच्या संदर्भात त्यांनी एकही शब्द मंत्रिमंडळाच्या रेकॉर्डवर आणलेला नाही. मी स्वत: त्यावेळचे मंत्रिमंडळाचे प्रोसिडिंग पाहिलेले आहे व आता आपण सभागृहाचा वेळ घेत आहात. आपण जनाची नव्हे तर मनाची लाज ठेवायला पाहिजे होती, आता ती सुध्दा सोडली असली तर माझ्यासारखा लहान कार्यकर्ता आपल्याला काय सांगू शकेल ? महाराष्ट्र एकसंघ राहताना महाराष्ट्रातील सर्व विभागांना पैसे दिले पाहिजेत. हा निधी देत असताना राज्यातील अनुशेष दूर करण्यासाठी आम्ही जाणीवपूर्वक व सातत्याने प्रयत्न करीत आहोत. तसेच पाटबंधारे विभागाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा केली जाते. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, पाटबंधा-याचा 4300 कोटी रुपयांचा अनुशेष आहे. त्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 1000 कोटी रुपयांचा अनुशेष दूर करणार आहोत. उर्वरित 3300 कोटी रुपयांचा अनुशेष पुढील 2-3 वर्षांत पूर्ण करण्यासाठी शासनाने रचना केलेली आहे. या अनुशेषाच्या नावाखाली सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व त्यांचे सहकारी महाराष्ट्रातील वेगवेगळया भागातील जनतेच्या मनात टोकाची भावना निर्माण करण्याचा जो प्रयत्न करीत आहेत, तो कृपया त्यांनी बंद करावा अशी मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ( वेलमध्ये उभे राहून ) : माननीय राज्यपालांकडून शासनाकडे जे पत्र आले आहे त्याचे काय झाले ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, पत्राचा आणि अनुशेषाचा काही संबंध आहे काय ? जे पत्र आलेच नाही, त्याच्याबद्दल मी काय सांगू शकतो. तसेच जे पत्र आलेच नाही त्याबाबत या ठिकाणी चर्चा कशी होऊ शकते, असा मला प्रश्न पडतो. या संदर्भात आपण प्रसार माध्यमांबद्दल आपण गैरसमज करुन घेत आहात, त्यांना रॉंग बॉक्समध्ये टाकत आहात. जर पत्र आलेच नाही तर मी आपल्याला कुठले पत्र दाखवू. त्यांनी सुरु केलेल्या नाटयाचा शेवट मनाप्रमाणे व्हावा असे त्यांना ...........

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभापती महोदय, हक्कभंग आणा, हक्कभंग आणा, हक्कभंग आणा ..... अशा घोषणा करुन हक्कभंग आणल्यास त्यावेळी मी काही असत्य बोलत आहे काय, हे आपल्याला कळेल. सभापती महोदय, मी या संदर्भात सर्व काही खर बोलत आहे, खोट बोलत नाही. तसेच मी या ठिकाणी अर्थसंकल्पावर बोलत आहे याचे मला भान राहिले पाहिजे, त्यांच्या मार्गाने मला जायचे नाही. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, या राज्यातील विदर्भ, मराठवाडयाचा एकत्रित असलेला उर्वरित अनुशेष दूर करण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये पाटबंधारे विभागासाठी 1000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हा अनुशेष दूर झाल्यानंतर उर्वरित 3300 कोटी रुपयांचा अनुशेष पुढील 2 वर्षांच्या काळामध्ये दूर करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून केला जाईल. सभापती महोदय, ......

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मोठमोठयाने घोषणा करत असतात.)

सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या ठिकाणी जेवढे जोरात बोलाल तेवढे माझे महत्व वाढणार आहे, कुणी विरोध केल्याशिवाय महत्व वाढू शकत नाही, यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. या ठिकाणी ज्या ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नाट्य सुरु केले, त्यावेळी नाट्याचा शेवट

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

जर त्यांच्या मनाप्रमाणे झाला नाही, त्या त्यावेळी त्यांनी वेलमध्ये येऊन दंगा केलेला आहे. त्यामुळे मला त्यांच्या वर्तनाचे काही आश्चर्य वाटत नाही. स्वत:च्या प्रवृत्तीसाठी सर्व भारतीय जनता पक्षाला व शिवसेना पक्षाला वेठीला धरायचे व त्यांना वेलमध्ये आणायचे, ही बाब बरोबर नाही, मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, आपल्या वेगळ्या दिशेचा असलेला प्रवास महाराष्ट्रातील जनता कधी सहन करुन घेणार नाही.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. सांगळे नंतर --- 12:05

श्री. जयंत पाटील .....

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... गोंधळ ..)

तुमचे हे कौतुकाचे बोल महाराष्ट्रातील जनता केव्हा समजेल असे वाटत नाही. निश्चितपणे राज्यातील वेगवेगळ्या भागामध्ये दरी निर्माण करण्याचा जो आपला प्रयत्न आहे तो यशस्वी होणार नाही, आणि राज्यातील विभागवार असलेला अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठ करण्यामध्ये, त्यासंबंधातील उत्तर शोधण्यामध्ये हे सरकार मागे राहणार नाही एवढाच विश्वास मी आपल्याला या निमित्ताने देतो. राज्यातील आर्थिक परिस्थिती सबल करण्यासाठी जे प्रयत्न या सरकारकडून झालेले आहत त्यातून एक उत्तम महाराष्ट्र घडण्याच्या दृष्टीने राज्याची आर्थिक परिस्थिती पुन्हा एकदा उचल घेत आहे. महाराष्ट्राच्या विकासवाढीचा वेग कसा वाढवावयाचा, आपण सतत पुढे कसे जायचे आणि बॅकलॉग सारखे विषय पुन्हा कधीही निर्माण न होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची, अनुशेष हा शब्दच आपल्या शब्दकोषामधून काढून टाकण्याची पूर्णपणे मानसिक तयारी या सरकारने केली आहे. आज 3300 कोटी रूपयांचा बॅकलॉगचा प्रश्न आहे, हा बॅकलॉग काही फार मोठा आहे असे नाही. त्यामुळे या पुढील कालखंडामध्ये ही सर्व रक्कम उभी करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत आणि या सभागृहामध्ये सिंचनाच्या अनुशेषाची चर्चा पुन्हा होणार नाही अशी व्यवस्था आम्ही निश्चितपणे करणार आहोत. ....

( काही विरोधी सदस्य तोंडावर हात ठेवून ओरडत असतात, घोषणा देत असतात...)

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या सगळ्यांचा आवाज ऐकून माननीय उपमुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये आलेले आहेत आणि ते आपल्याला काही सांगू पहात आहेत तरी आपण त्यांचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्यावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपले सभागृह हे 'वरिष्ठांचे सभागृह' म्हणून ओळखले जाते. उद्या गुढी पाडवा आहे आणि पाडव्याच्या आदल्या दिवशी आमचे मित्र येथे होळी, शिमगा करू लागले आहेत, तोंडावर हात ठेवून ओरडत आहेत .... वास्तविक किमान हिंदू संस्कृतीचे संरक्षण तरी त्यांनी केले पाहिजे. गुढी पाडव्याच्या पूर्वदिनी अशा प्रकारे तोंडावर हात ठेवून ओरडणे हे आमच्या मित्रांना शोभत नाही आणि ते योग्य देखील नाही. तरी आपण त्याबद्दल त्यांना तंबी द्यावी.

( विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असतात ..... गोंधळ ... )

..... एन 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय श्री.अटलबिहारी बाजपेयी यांनी सांगितले आहे की, सदस्यांनी 'वेल'मध्ये येऊ नये एवढे संकेत तरी पाळले पाहिजेत. तेव्हा आमच्या विरोधी मित्रांनी किमान पक्षी त्यांच्या सर्वोच्च नेत्यांच्या बोलण्याचे तरी भान ठेवावे. बाजपेयींचे नाही तर अडवानींचे, अडवानींचे नाही तर प्रमोद महाजनांचे आणि महाजनांचे नाही तर निदान आपले येथील सहकारी श्री.गोपीनाथजी मुंडे यांची तरी ठेवावी. .... सभापती महोदय, मी हेही जाणून आहे की, 'असे काही करावे हे विरोधी पक्षातील काहींच्या मनामध्ये नसेलही पण सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या हट्टापोटी हे सगळे त्यांना करावे लागते आहे. ... सभापती महोदय, या वर्षीचा अर्थसंकल्प राज्याला पुढे नेणारा, विकासवाढीचा वेग वाढविणारा आणि सक्षमतेने विकासाकडे नेणारा आहे. हा अर्थसंकल्प आपण मंजूर करावा एवढीच विनंती मी या प्रसंगी आपल्याला करतो. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या राज्यातील सगळ्यात महत्त्वाची जी योजना आहे ती शेवटी मला आपल्या पुढे सांगावयाची आहे, ती आपण ऐकून घ्यावी. आम्ही मानवी विकास अहवालाचा प्रस्ताव येथे मांडला आहे. मानव विकास निर्देशांकाची चर्चा आपण यापूर्वी कधी येथे केलेली नाही. पण आपल्या राज्यामध्ये कोणत्या भागामध्ये, कोणत्या जिल्ह्यामध्ये मानव विकास निर्देशांक कमी आहे हे सर्वप्रथम आमच्या आघाडीच्या सरकारने हुडकून काढले आहे. सर्व प्रकारचा विकास हात असताना तेथील शिक्षण आणि दरडोई उत्पन्न लक्षात घेऊन हा मानव विकास निर्देशांक काढला जातो. यवतमाळ, बुलडाणा, अकोला येथील मानव विकास निर्देशांक कमी आहे तसेच धुळे, नंदूरबार या जिल्ह्यांतील मानव विकास निर्देशांक देखील कमी आहे. तेव्हा या जिल्ह्यांना सबल करणे आमचे काम आहे आणि त्यासाठीच आपण एक मिशन नेमले आहे. त्याद्वारा या सगळ्या जिल्ह्यांमध्ये, जेथे मानव विकास निर्देशांक कमी आहे तेथे हा निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने ताकदीने काम करावयाचे आम्ही ठरविले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

सभापती महोदय, तेथील दरडोई उत्पन्न...

(विरोधी पक्षाकडील माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी मानवी विकास निर्देशांकाचा याठिकाणी उल्लेख केला आहे. त्या संदर्भात मला त्यांना असे विचारावयाचे आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या विकासाकरीता या निर्देशांकामध्ये समावेश करणार काय?

(गोंधळ)

**उपसभापती** : अशा परिस्थितीत कामकाज करणे शक्य नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज मी 5 मिनिटांकरीता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.10 ते 12.15 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य 'वेल'मध्ये येतात.)

...(अडथळा)...

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, शेवटी वेगवेगळ्या विभागातील अस्परेशन्स आहेत. मला असे वाटते की, पाटबंधाऱ्याचा अनुशेष कायमचा संपविण्यासाठी सभागृहातील प्रमुख नेत्यांबरोबर एकत्र बसून यावर काही मार्ग काढावा.तसा आमचा प्रयत्न आहे. या विषयाच्या संबंधाने सगळ्यांचे गैरसमज वाढायला लागलेले आहेत. शेवटी मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर पुरवणी मागण्या या ठिकाणी येतात. त्या कोणी इंडिव्हियुजल करत नाहीत, मंत्रिमंडळाच्या मान्यतने पुरवणी मागण्या येतात. त्यामुळे एकंदर वेगळ्या गरजा आणि त्यातून येणारे समज-गैरसमज दूर करण्यासाठी या राज्यातील सन्माननीय प्रमुख नेत्यांना एकत्र करुन कायमचा मार्ग काढण्याचा विचार करतो आहोत.

....(अडथळा)....

(घोषणा देण्यात येतात.)

सभापती महोदय, मला एकच सांगावयाचे आहे की, मानवी विकासाचा निर्देशांकाच्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे साहेबांनी उल्लेख केला. राज्यातील जे जिल्हे मागे आहेत, त्या जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या समाजाचे लोक रहातात. शेवटी मानवी विकासाचा निर्देशांक हा शिक्षण, आरोग्य, दरडोई उत्पन्न एकत्र करुन तयार केला जातो.

....(अडथळा)...

(घोषणा देण्यात येतात.)

मुंबई आणि मुंबईतील उपनगरे यांना 1 गुण दिला तर याच राज्यातील नंदुरबार सारख्या जिल्ह्याला 0.20 गुण द्यावे लागतात. एवढी तफावत मुंबई आणि या नंदूरबार जिल्ह्याची आहे. ही तफावत भरुन काढण्यासाठी जाणीवपूर्वक सरकार प्रयत्न करत आहे. म्हणून मानवी विकास निर्देशांकामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही 'मिशन' स्थापन करण्याचे ठरविलेले आहे.

....(अडथळा)....

(घोषणा देण्यात येतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.जयंत पाटील (पुढे सुरु.....

सभापती महोदय, मी सभागृहात बोललो आणि ते झाले नाही असे कधी झालेले नाही. मी कधी खोटी आश्वासने दिलेली नाहीत, तरी देखील विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य अशा स्वरुपाचे निवेदन करत असतील तर शेवटी नाईलाजाने मला सांगावे लागते की,...

...(अडथळा)...

(घोषणा देण्यात येतात.)

आम्ही शाळेमध्ये इयत्ता तिसरी आणि चौथीमध्ये शिकत असताना, एखादा मुलगा थापाड्या आहे, तो अमका आहे, तमका आहे म्हणून एकत्रितपणे विद्यार्थ्यांचा गट करुन घोषणा देत होतो. लहान मुले असतात, त्याप्रमाणे विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकत्र गटाचा समूह करुन वागत आहेत. त्यांच्या या बौधिकतची कीव कराविशी वाटते. पत्र दाखवा, असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. माननीय राज्यपालांचे स्वतंत्रपणे पत्र आले नसेल तर मी काय दाखविणार ? मी फार भाषण करत नाही. खरे म्हणजे दोन महत्वाचे बदल केले. एक म्हणजे या राज्यातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत माणूस आहे, मग ते कोणत्याही समाजाचे असले तरी त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याची भूमिका या अर्थसंकल्पामध्ये मांडलेली आहे. या राज्यातील कोणी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे म्हणून शिक्षण घेऊ शकत नाही, अशांसाठी राज्य सरकारने मूलभूत निर्णय घेतलेला आहे की,आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्तीला राज्य सरकार मदत करेल, अशी आमच्या सरकारची भूमिका आहे. तसा विचार या राज्य सरकारने केलेला आहे, त्याचा उल्लेंख या अर्थसंकल्पात नाही. पण सभापती महोदय, ओ.बी.सी. समाजातील जो गरीब माणूस आहे, ठराविक आर्थिकदृष्ट्या तो सक्षम नाही त्यांच्यासाठी शिक्षणाची पूर्ण व्यवस्था करावी, ही भूमिका घेऊन सभागृहाच्या माध्यमातून आम्ही येत आहोत. ओ.बी.सी.समाजाची शिक्षणाची व्यवस्था करावी ही जाणीवपूर्वक भूमिका आम्हा सर्वांची आहे. ती योजना पूर्णत्वाला आलेली नसली तरी लवकरच ती योजना घेऊन सभागृहासमोर आम्ही येणार आहोत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

या राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, राज्यातील ओबीसी समाजातील तरुण मुले यांच्या शिक्षणाची पूर्ण ताकदीने व्यवस्था करण्याचे येथून पुढे राज्य शासनाने धोरण राहील. सभापती महोदय, मी या ठिकाणी फार मोठे भाषण करणार नाही. मला समोरच्या बाकावरील सदस्यांकडून चिठ्ठी आलेली आहे की, आता आम्ही किती वेळ ओरडावयाचे ? तुम्ही भाषण लवकर पूर्ण केले नाही तर आम्हाला ओरडून ओरडून थकावयास होते. म्हणून विरोधकांकडे बघून, त्यांची परिस्थिती बघून मी माझे भाषण थांबविणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी आता ओरडण्याचे थांबविलेले आहे. मला कल्पना आहे की, त्यासाठी स्टॅमिना लागतो. ओरडण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी स्टॅमिना लागतो. राज्य सरकारविरुध्द लढण्यासाठी धमक लागते, स्टॅमिना लागतो. आम्ही पाच वर्षे ते केलेले आहे. माननीय श्री. नितीन गडकरी साहेब, आपली तर सुरुवात आहे. मी लवकर भाषण थांबवावे अशी आपण मला चिठ्ठी पाठविलेली आहे. आपल्यावर दया करुन मी माझे भाषण थांबविणार आहे. सभापती महोदय, मला अनेक विषय मांडावयाचे होते, अनेक प्रस्ताव ठेवावयाचे होते, राज्याच्या विकास वाढीचा वेग कसा वाढत आहे हे सांगावयाचे होते. पण सन्माननीय सदस्यांच्या अशा प्रकारच्या बोलण्याच्या पध्दतीमुळे आणि त्यांनीच मला कळविले आहे की, आता लवकर भाषण थांबवावे म्हणून मी माझे भाषण आटोपते घेतो. सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांवर निश्चितपणाने गांभीर्याने विचार करुन त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल. एवढा विश्वास देऊन मी या अर्थसंकल्पावरील माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून दुपारी 2.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दु. 12.21 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

------

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 14:00

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज सकाळच्या सत्रामध्ये आम्ही या सभागृहामध्ये एक मुद्दा उपस्थित केला होता त्याचे उत्तर आम्हाला मिळालेले नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी परवा विनियोजन विधेयकावर सही केल्यानंतर काल ते विधेयक या सभागृहामध्ये मांडण्यात आले. तत्पूर्वी या विनियोजन विधेयकावर सही करीत असताना माननीय राज्यपाल महोदयांनी शासनाला काही डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. माननीय राज्यपालांचे निर्देश पायदळी तुडवून 1042 कोटी रुपयांचे वाटप केले होते आणि त्यासंदर्भात विरोधी पक्षाचे शिष्टमंडळ माननीय राज्यपाल महोदयांना जाऊन भेटले होते. त्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी विनियोजन विधेयक मांडण्यास परवानगी दिली नाही. इतिहासामध्ये पहिल्यांदाच अशी घटना घडलेली आहे. त्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी विनियोजन विधेयकावर सही केली व विधेयक या सभागृहामध्ये मांडण्यात आले. हे विधेयक या सभागृहामध्ये आल्यानंतर त्यासंदर्भात आमची एकच मागणी होती की, माननीय राज्यपाल महोदयांनी जे डायरेक्शन्स, ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या या सार्वभौम सभागृहासमोर आल्या पाहिजेत. माननीय वित्त मंत्र्यांनी विधानसभा सभागृहामध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या सूचनांचे वाचन केलेले आहे. मग ते डायरेक्शन्स, सूचना या सभागृहामध्ये सांगण्यास कोणती हरकत आहे ? ज्याअर्थी विधानसभा सभागृहाला माननीय राज्यपालांनी दिलेल्या सूचना अथवा डायरेक्शन समजून घेण्याचा अधिकार आहे, तोच अधिकार या विधानपरिषद सभागृहाला देखील आहे. परंतु माननीय राज्यपालांचे डायरेक्शन्स, सूचना या सभागृहापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. आम्ही ज्या पत्राची सातत्याने मागणी करीत आहोत ते पत्र आम्हाला न देता केवळ कामकाज रेटून नेण्याचा प्रकार या सभागृहामध्ये होत आहे. आमच्या अधिकारावर हे अतिक्रमण होत आहे. माननीय राज्यपालांचे निर्देश किंवा डायरेक्शन्स ही गोपनीय कागदपत्रे नाहीत. निधीचे वाटप कशा पध्दतीने केले पाहिजे यासंबंधीचे डायरेक्शनस ही गोपनीय बाब नाही. तेव्हा विधानसभा सभागृहामध्ये जे काही वाचून दाखविले ते विधानपरिषद सभागृहामध्ये देखील वाचले पाहिजे असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये असा प्रश्न उपस्थित झाला होता की, विनियोजन विधेयक मांडण्यासाठी परवानगी मागण्याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्त मंत्र्यांनी माननीय राज्यपाल महोदयांची भेट घेतली. त्यावेळी त्यांच्यामध्ये काय चर्चा झाली हे मला माहीत नाही. विनियोजन विधेयक मांडण्यास परवानगी देताना माननीय राज्यपाल महोदयांनी राज्य सरकारला काही सूचना केल्या. त्याबाबत आम्हाला निरनिराळया वर्तमानपत्रातून निरनिराळया बातम्या वाचायला मिळाल्या. माननीय राज्यपाल महोदयांनी ज्या काही सूचना राज्य सरकारला केलेल्या आहेत त्या या सार्वभौम सभागृहातील सन्मानीय सदस्यांना समजण्याचा अधिकार आहे. याबाबत जेव्हा आम्ही सभागृहामध्ये विचारणा केली त्यावेळी माननीय वित्त मंत्र्यांनी, "असे काही आम्हाला आलेले नाही, असे काही घडलेले नाही, फक्त परवानगी आली" असे सांगितले. माननीय राज्यपाल महोदयांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचना खालच्या सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आलेल्या आहेत. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, विधानसभा सभागृहामध्ये एखाद्या गोष्टी बद्दल विचारणा केल्यावर त्याला "होय" म्हणून उत्तर दिलेले आहे आणि विधानसभा सभागृहामध्ये "असे काही आलेले नाही" असे सांगितले आहे. त्यामुळे या सभागृहाची माननीय वित्त मंत्र्यांनी दिशाभूल केलेली आहे. जी माहिती विधानसभा सभागृहामध्ये सांगितली तीच माहिती विधानपरिषद सभागृहामध्येही सांगितली पाहिजे. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधून सांगू इच्छितो की, काल या सभागृहामध्ये घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने वित्त मंत्र्यांनी "अशा काही सूचना आलेल्या नाहीत" असे सांगितले.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. शिगम 14:05

श्री. नितीन गडकरी ...

परंतु विधानसभा सदनामध्ये अर्थमंत्र्यांनी राज्यपाल महोदयांचे पत्र वाचून दाखविले आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांमध्ये तफावत निर्माण झालेली आहे. दोन्ही सदनांमध्ये फरक केलेला आहे. भेदभाव केलेला आहे. सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. जे काही केले हरकत नाही. परंतु वित्तमंत्र्यांनी राज्यपाल महोदयांच्या सूचना आणि एकंदर सत्यस्थिती सभागृहासमोर ठेवावी अशी मी विनंती करतो.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, अर्थमंत्र्यांनी विधानसभा सदनामध्ये जे निवेदन केलेले आहे त्याबाबतची माहिती निश्चितपणाने आज सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी या सदनामध्ये दिली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधानसभा सदनामध्ये काय घडते आणि काय घडत नाही याचा आम्ही गांभीर्याने विचार करीत नाही. प्रश्न आहे तो या सदनामध्ये काय घडते त्याचा. गेले 4-5 दिवस विनियोजन विधेयकावरुन सदनामध्ये चर्चा सुरु आहे. विरोधी पक्ष म्हणून आम्ही एवढीच मागणी केली की, माननीय राज्यपालांनी विनियोजन विधेयक मांडू नये असे सांगितले होते त्याची कारणे काय ? आम्ही राज्यपालांची भेट घेतल्यानंतर माझ्या माहितीप्रमाणे राज्यपालांनी विधेयक मांडू नये असे सांगितले होते. त्यानंतर राज्यपालांनी विधेयकाला मंजुरी दिल्यावर ते येथे मांडले. राज्यपालांनी विधेयक मंजूर करताना ज्या काही सूचना केल्या असतील काही विनंती केली असेल त्याबद्दलची माहिती या सदनामध्ये मिळणे हा सदनाचा अधिकार आहे आणि सदनाच्या माध्यमातून आमचा अधिकार आहे. आम्ही आपल्याकडे सुध्दा याबाबत मागणी केली तो आमचा वैधानिक अधिकार आहे. आमच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. आम्ही आपल्याकडे संरक्षण मागू शकतो सरकारकडे मागू शकत नाही. त्यादृष्टीनेच आम्ही आपल्याकडे मागणी केली होती. खालच्या सदनामध्ये राज्यपालांच्या सूचना वाचून दाखविल्या असतील तर या सदनामध्ये सुध्दा त्या सूचना वाचून दाखवाव्यात किंवा पटलावर ठेवाव्यात आणि खालच्या सदनात जे काही घडले त्याची माहिती ताबडतोब या सदनाला द्यावी अशी मी आपल्यामार्फत सरकारला विनंती करतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे की राज्यपालांनी दिलेल्या डायरेक्शनच्या संदर्भात गेले 3-4 वर्षे सातत्याने कागदपत्रे मिळावीत म्हणून संघर्ष करावा लागत आहे. आमच्या समोर असलेले विनियोजन विधेयक 2/3 दिवसापूर्वी मांडले गेले.

29-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. शिगम 14:05

प्रा.बी.टी.देशमुख ...

One constitutional functionary cannot communicate with another constitutional functionary on oral basis. It can function only on written basis. हे सभागृह खालच्या सभागृहाला लेखी संदेश पाठविते सचिव तो त्याठिकाणी वाचून दाखवितात. आम्हांला संरक्षण पाहिजे. राज्यपालांनी जो मेसेज दिलेला आहे तो may be in the form of letter or noting on the file, the full text of the message must be circulated to the Hon. Members of this House. आमचा हा अधिकार आहे. आमचे दुर्दैव आहे ती माहिती या सभागृहामध्ये ठेवण्यामध्ये आम्हांला अपयश आले. माझी ठामपणाने मागणी आहे की रिटन मेसेज असेल तर तो निश्चितपणाने या सदनामध्ये वाचून दाखविला पाहिजे. नाही तर ओळखा पाहू ? ही पध्दत चालणार नाही. तशा प्रकारचे आदेश आपण शासनाला द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा होती. आमचा आग्रह एवढाच होता की अर्थसंकल्पाशी निगडीत ही बाब आहे. विनियोजन विधेयक हे अर्थसंकल्पाशी निगडीत आहे. 4-5 मुद्यांच्या संदर्भात घटनात्मक परिस्थिती निर्माण केली गेल. आपल्याकडे आम्ही आंदोलनात्मक पवित्रा घेतला. आमचा हक्क तुमच्यावर आहे. आम्ही एवढीच विनंती केली की राज्यपाल महोदयांनी जे पत्र शासनाला दिले आहे त्याबाबतची माहिती सदनामध्ये सांगा. केवळ आम्हांला संरक्षण न मिळाल्यामुळे आणि शासनाच्या अडेलतट्टू धोरणामुळे या सदनामध्ये अर्थसंकल्पावर जी चर्चा होती त्या चर्चेमध्ये विरोधी पक्षाचे सदस्य म्हणून आमचे मत मांडायला आम्हांला संधी मिळाली नाही. आमचा हक्क डावलला गेला. खालच्या सदनामध्ये वित्त मंत्र्यांनी जे वाचून दाखविले ते या सदनामध्ये सुध्दा वाचून दाखविले जाईल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. एवढा अधिकार आम्ही गमावल्यानंतर तो अधिकार आपण आम्हांला द्यावाच अशी आमची विनंती आहे.

या नंतर श्रीं पी. खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

हक्क म्हणून आम्हाला अधिकार द्यावा आणि आपला संरक्षण देण्याचा जो अधिकार आहे तो वापरावा आणि हे निवेदन तातडीने येथे करण्यासंबंधीचे आदेश मंत्री महोदयांना द्यावेत, कारण तेच महत्वाचे आहे व त्यामुळे येथे घटनात्मक पेच निर्माण झाला आहे.

श्री. विलासराव देशमुख : महोदय, माननीय अर्थमंत्री हे खालच्या सभागृहात आहेत, त्यांचे तेथे उत्तराचे भाषण सुरु आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपल्याकडे सध्या प्रश्नोत्तराचा तास सुरु आहे व तो देखील तितकाच महत्वाचा आहे, प्रश्नोत्तराचा तास संपेपर्यंत त्यांचे खालच्या सभागृहातील भाषण संपेल. ते येथे आल्यानंतर खालच्या सभागृहात त्यांनी जी माहिती दिली ती माहिती त्यांनी येथे द्यावी.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्यांनी खालच्या सभागृहात अर्थमंत्र्यांनी माहिती दिली, ती माहिती येथे देत नाहीत, हे डिस्क्रीमिनेशन आहे, यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. मी एवढेच म्हणालो की, माननीय अर्थमंत्र्यांनी खालच्या सदनात जी माहिती दिली ती माहिती त्यांनी येथे द्यावी.

श्री. नितीन गडकरी : महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी सकाळीच या सभागृहात सांगितले की, अशी कुठलीच माहिती नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी. आता प्रश्नोत्तराचा तास सुरु करण्यात येत आहे. ता.प्र.क्र.12790....

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मुंबईच्या विविध प्रकल्पांसाठी करण्यात आलेली 1000 कोटींची तरतुद**

**(1) * 12790 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मुंबईच्या विविध प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात (राज्य) 1000 कोटींची तरतूद करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(2) असल्यास सदर रक्कम केंद्राकडून राज्याला मिळाली आहे काय, तसेच नियोजन विभागाने आक्षेप घेतल्याने या रकमेतील 540 कोटी रुपये मुंबई महापालिकेऐवजी राज्यातील अन्य महापालिकांकडे वळविण्यात आले हे खरे आहे काय,

(3) असल्यास, नियोजन विभागाने अर्थसंकल्पीय तरतूद असलेल्या रकमेवर आक्षेप घेण्याचे कारण काय आहे,

(4) या संदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(5) संपूर्ण रक्कम मुंबई महापालिकेस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) ते (5) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षी रु. 1000 कोटी नियतव्यय उपलब्ध झाला होता. हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. तो दिनांक 3 डिसेंबर, 2005 रोजी राष्ट्रीय पातळीवरुन सुरु झाला. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेड या पाच शहरांचा समावेश आहे. या शहरांचे दीर्घकालीन शहर विकास आराखडे तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करुन विविध प्रकल्प अहवाल पाठवावयाचे आहेत. यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर या शहरातील शहर विकास आराखडे पूर्ण केले आहेत. त्यास राज्य शासनाच्या सुकाणू समितीची मान्यता मिळाल्यानंतर केंद्र शासनास सादर केले आहेत. वरील प्रकल्प मंजूरीबरोबरच राज्य शासनास तसेच महानगरपालिकांना सक्तीच्या सुधारणा करणे आवश्यक आहे.

वरील रुपये 1000 कोटीची तरतूद नियोजन आराखड्यात असली तरी केंद्र शासनाकडून त्यांचे अनुदान आल्यानंतर राज्य शासन आपला हिस्सा देईल.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. संजय दत्त : महोदय, माननीय अर्थमंत्र्यांच्या सन 2005-06 च्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या पृ.क्र.45 वरील मुद्दा क्र. 83.01 वर असा स्पष्ट उल्लेख आहे की, मुंबईच्या विकासासाठी सन 2005-06 या वर्षासाठी 1000 कोटीची तरतूद केली जाईल, मात्र सदर तरतूद नियोजनाच्या आराखडयात असली तरी त्याचे अनुदान केंद्रशासनाकडून आल्यानंतर राज्यशासन आपला हिस्सा देईल. यासंदर्भात मंत्री महोदय स्पष्टीकरण करतील काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युएशन मिशनसंबंधीची घोषणा डिसेंबर, 2003 मध्ये माननीय पंतप्रधानांनी केली होती. त्याचा आऊट-ले जाहीर झाल्यानंतर ज्यावेळी केंद्रसरकार पैसे देईल त्यावेळी राज्यशासन आपला हिस्सा देण्यास बांधिल आहे.

..........3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12790....

श्री. मुजफ्फर हुसैन : महोदय, नियोजन विभागाने आक्षेप घेतल्यामुळे ही रक्कम खर्च न करता त्यातील 540 कोटी रुपये अन्य महानगरपालिकांकडे वळविण्यात आले हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, एनयुआरएमची जी रक्कम होती त्या रकमेशी याचा कुठलाही संबंध नाही. रजिस्टर्ड योजनांसाठी जी तरतूद होती त्या पध्दतीनेच हा खर्च झालेला आहे व एनयुआरएमची रक्कम कुठेही वापरलेली नाही अथवा वळविलेली नाही.

श्री. मुजफ्फर हुसैन : महोदय, एनयुआरएम योजनेच्या संदर्भात बृहन्मुंबईची लोकसंख्या 1.65 कोटी इतकी दाखविलेली आहे. मला या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, या 1.65 कोटी लोकसंख्येमध्ये फक्त मुंबईचीच लोकसंख्या समाविष्ट आहे की, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर आणि भिवंडी महानगरपालिकेच्या क्षेत्राचाही समावेश आहे ? जर असे नसेल तर या महापालिकांच्या क्षेत्राचा यामध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने शासन केंद्रशासनाकडे प्रस्ताव पाठविणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या महापालिका क्षेत्राचा तुतास तरी बृहन्मुंबईमध्ये समावेश केलेला नाही परंतु कल्याण-डोंबिवली आणि ठाणे परिसर सुध्दा यामध्ये समाविष्ट करावा यासाठी केंद्रशासनाबरोबर विचार-विनिमय करुन निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12790...

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, यात नाव समाविष्ट करण्यासंबंधीचा ठराव आमच्या महानगरपालिकेने पारित केला असून तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे. तेव्हा आमच्या महानगरपालिकेचा यात समावेश करण्यासाठी शासन निर्णय घेणार आहे काय ?

(गोंधळ)

श्री.राजेशे टोपे : सभापती महोदय, याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

(गोंधळ)

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान योजनेसाठी रुपये 1000 कोटी नियतव्यय उपलब्ध झाला आहे. यात राज्य शासनाला देखील स्वत:चा हिस्सा द्याला लागणार आहे. तेव्हा योजनेसंबंधी राज्य शासन किती रुपयांचा आपला हिस्सा उपलब्ध करून देणार आहे ?

(गोंधळ)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ज्याप्रमाणात केंद्र शासन निधी वितरित करील त्याप्रमाणात आवश्यक तेवढा राज्य शासन आपला हिस्सा वितरित करील.

(गोंधळ)

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...(गोंधळ)...

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फर्मेशन.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. या देशाचे माजी पंतप्रधान आदरणीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकसभेमध्ये किंवा विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी वेलमध्ये येऊन गोंधळ किंवा घोषणा देऊन सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणू नये असे सांगितले होते. परंतु, भारतीय जनता पार्टीच्या सन्माननीय सदस्यांना माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांची आचारसंहिता माहीत नसावी. सन्माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या आचारसंहितेची आठवण करून देण्यासाठी मी माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वेलमध्ये येऊन घोषणा देणे ही पद्धत योग्य नाही, असे मला वाटते. तेव्हा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कृपा करून आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(घोषणा)

...

**ता.प्र.क्र.15667**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**नागरी जमीन कमाल धारणा कायदा रद्द करणेबाबत**

**(३) * १२९४२ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी जमिन कमाल धारणा कायदा रद्द केल्याशिवाय मुंबई शहराच्या पायाभूत सोईसाठी अनुदान मिळणार नाही असे केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा कायदा रद्द करण्याचे आश्वासन राज्य सरकारने केंद्राला दिले आहे हे ही खरे आहे काय, व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (1) व (2) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निर्माण अभियानामध्ये अनिर्वाय व ऐच्छिक अशा नागरी सुधारणा अपेक्षित आहे. त्यामध्ये नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम रद्द करणे ही एक अट आहे.

राज्य शासनाने हा अधिनियम पाच वर्षात रद्द करण्याबाबत केंद्र शासनाबरोबर समझौता करार केलेला आहे.

(गोंधळ)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाच्या उत्तराने माझे समाधान झाले असल्यामुळे मला उपप्रश्न विचारावयाचा नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, नागरी जमीन कमाल धारणा कायद्यासंबंधी केंद्र शासनाने राज्या शासनाकडून नुकतीच माहिती मागितली होती. मुंबई, ठाणे, पुणे वगळून इतर जिल्हयांना नागरी जमीन कमाल धारणा कायदा लागू होणार नाही, असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यासंबंधीची बातमी वृत्तपत्रात आली होती. माझे तर असे म्हणणे आहे की, मुंबई-ठाणे-पुणे येथेसुध्दा सध्या लागू असलेला सदर कायदा रद्द करण्याची गरज आहे. तेव्हा मुंबई, ठाणे व पुणे या शहरांना लागू असलेला नागरी जमीन कमाल धारणा कायदा रद्द करण्यासंबंधीचा निर्णय शासन कधी घेणार आहे व सदर कायदा किती दिवसात रद्द करण्यात येणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई, ठाणे, पुणे या तीन जिल्हयांना वगळून उर्वरित जिल्हयांमधून नागरी जमीन कमाल धारणा कायदा निरसन करण्याच्या दृष्टीने शासन विधेयक आणणार आहे. सदर कायद्याचे निरसन झाल्यानंतर मुंबई, ठाणे व पुणे या तीन जिल्हयांसाठी स्टेट कायदा आणणार आहोत.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12942...

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, नागरी जमीन कमाल धारणा कायद्यामधून नाशिक जिल्हयाला वगळण्यासंबंधीचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. तेव्हा यासंबंधीचे आदेश शासन किती दिवसात काढणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यासंबंधी पुढच्या अधिवेशनामध्ये विधेयक आणणार आहोत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत मागील 6 वर्षाच्या काळात किती हेक्टर जमीन राज्य शासनाने ताब्यात घेतली आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12942....

श्री.राजेश टोपे : जे संपादन क्षेत्र आहे, त्यामध्ये दिनांक 31 जानेवारी, 2006 पर्यंत 22,806 सदनिका मिळणार आहेत. त्यापैकी 13,861 सदनिका मिळाल्या असून, 8945 सदनिका मिळणे बाकी आहे. तसेच संपादन क्षेत्रामध्ये 522 हेक्टर इतके संपादन क्षेत्र मिळणार आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ व कार्गो हब प्रकल्पाअंतर्गत सोयी सुविधासाठी विदेशी बँकांकडून कर्ज उभारण्याबाबत**

**(४) * १५५३३ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सुमारे ३,५८८ हेक्टर जमिनीवर आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कार्गो हब प्रकल्पांतर्गत सोयीसुविधांसाठी विदेशी बँकांकडून एक हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यासंदर्भात करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेश टोपे**, **श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नागपूर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कार्गोहब प्रकल्पांतर्गत सोयी सुविधांसाठी विदेशी बँकांकडून कर्ज उभारण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नव्हता.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कृपया आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे. या ठिकाणी आताच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ठोस सांगितले आहे की, जे निवेदन विधानसभा सभागृहात माननीय अर्थ मंत्र्यांनी केलेले आहे, ते निवेदन लवकरात लवकर या सभागृहात केले जाईल. त्यामुळे कृपया आपण खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी आपला प्रश्न विचारावा.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतच असतात.)

श्री.राजेंद्र जैन : सभापती महोदय, नागपूर स्थित अंतरराष्ट्रीय विमानतल एवं कार्गो हब प्रोजेक्ट के लिए कितना खर्च अनुमानित है तथा राज्य सरकार इस प्रोजेक्ट के लिए धनराशि कैसे और कहां से उपलब्ध कराएगी ?

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15533....

श्री.राजेश टोपे : या प्रकल्पाचा अंदाजित खर्च 2581 कोटी रुपये इतका आहे. यासाठी शासन फक्त 200 कोटी रुपये भू-संपादनासाठी उपलब्ध करुन देणार आहे. या प्रकल्पासाठी 3303 हेक्टर जमीन लागणार आहे. त्यापैकी 1480 हेक्टर जमीन संपादीत झालेली आहे. पुढील जी काही रक्कम लागणार आहे ती महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी आपल्या जमीन विक्रीतून उभी करणार आहे.

श्री.राजेंद्र जैन : सभापति महोदय, राज्य सरकार भूमि संपादन के लिए कब तक धनराशि उपलब्ध करके देगी ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी 80 कोटी रुपये आतापर्यंत दिलेले आहेत. भू-संपादनासाठी 200 कोटी रुपयांपर्यंतची तरतूद शासनाने मान्य केली आहे. उर्वरित लागणारी रक्कम निश्चितप्रकारे उपलब्ध करुन दिली जाईल.

-----------

..4..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीच्या मुद्यासंबंधी**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशासंदर्भात माननीय अर्थमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात जे निवेदन केले आहे ते या सभागृहामध्ये करण्याबाबतची भूमिका माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केलेली आहे. परंतु तरी सुध्दा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हे वेलमध्ये घोषणा देत आहेत. मला वाटते या मुद्याचे त्यांना केवळ राजकारण करावयाचे आहे. खरे म्हणजे युती सरकार सत्तेवर असतानाच हा अनुशेष वाढला आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी या मुद्याचे केवळ राजकारण करीत आहेत. सभागृहातून बाहेर गेल्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी आणि विनोद तावडे हे इलेक्ट्रॉनिक मिडीयासमोर जाणार. ते या मुद्याचे राजकारण करीत असल्यामुळे मी त्याचा निषेध करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतच असतात.)

**सभापती** : मी पुन्हा एकदा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपया आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी वस्तुस्थिती सांगितली आहे. माननीय अर्थमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहामध्ये जे निवेदन केले आहे, तेच निवेदन या सदनामध्ये सुध्दा करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नुकतेच सांगितलेले असताना सुध्दा, अशा प्रकारे वेलमध्ये येणे योग्य नाही, शिवाय ते शिस्तीच्याही दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे कृपया सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT यापूर्वी श्री. बोर्डे .. 14.25

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

**कॉलेजपासून ५० मिटरच्या आत सिगारेट व तंबाखू मिश्रीत पदार्थांची होत असलेली विक्री**

**(५) * १३१४२ श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेजापासून ५० मीटर्सच्या हद्दीत सिगारेट, तंबाखू मिश्रीत पदार्थांच्या विक्रीस बंदी घातली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात नव्वद टक्के कॉलेजांजवळ या नियमाला हरताळ फासून कॉलेजपासून ५० मीटर्सच्या आतच सिगारेट व तंबाखू मिश्रीत पदार्थ विकले जातात तसेच हल्ली कॉलेजामधील विद्यार्थींनी मध्ये सिगरेट पिण्याचे प्रमाण अधिक वेगाने वाढत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कायद्याची कडक अंमलबजावणी होण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री. मनोहर नाईक** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कायदा केंद्र शासनाचा आहे व कायद्यातील प्रचलित तरतूदींची अंमलबजावणी होत आहे.

----------

**कृषि कार्यालय, (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे रो.ह.यो. अंतर्गत सुरु असलेल्या कामातील भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत**

**(६) * १५०८६ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि कार्यालय, ता.भूम जि.उस्मानाबाद येथे चालू असलेल्या नागेवाडी, निपाणी, सुकटा, घाटलांदूर, चिंचोली सोनगीरी येथील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत शासनाकडे तक्रार आली आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचाराच्या तक्रारीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, यांसदर्भात तहसिलदार भूम यांनी तालुका कृषि अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत तहसिलदार यांनी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) होय.

(२) (अ) रोहायो अंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये भ्रष्टाचार करणे व गहू/धान्य न मिळणेबाबत.

ब) भूम तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कर्मचारी मुख्यालयी न रहाणे.

क) भूम तालुक्यातील कामाची चौकशी करणे.

(३) तहसिलदार, भूम यांनी तालुका कृषि अधिकारी, भूम यांना चौकशी करुन अभिप्रायासह चौकशी अहवाल व रेकॉर्ड देण्याबाबत सूचना दिल्या आहेत हे खरे आहे.

(४) तहसीलदार, भूम यांच्याकडील चौकशी अहवाल अद्याप प्राप्त आहे.

उप विभागीय अधिकारी, भूम यांनी प्राथमिक चौकशी केली असून तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसून आले आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही. ----------

२......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

**कल्याण-डोंबिवली परिसरात अनधिकृत इमारतींचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत**

**(७) * १३२६३ श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि. ठाणे) या शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याने या अनधिकृत इमारतींचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे काम माहे डिसेंबर, २००५ रोजी वा त्या दरम्यान हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केलेल्या सर्वेक्षणात किती इमारती अनधिकृत असल्याचे आढळून आले व या अनधिकृत इमारतींबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राचे नगर भूमापन करण्याचे काम डिसेंबर २००५ पासून सुरु करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राचे नगर भूमापन करण्याचे काम किती दिवसांत पूर्ण होणार आहे ? व माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत झालेल्या कामांनुसार, आपल्याला किती इमारती अनधिकृत असल्याचे आढळून आले. तसेच, या अनधिकृत बांधकामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही सुरु केली ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली नगरपालिकेमध्ये सेटलमेंट कमिशनर व इतर लोकांनी प्रायव्हेट लोकांकडून सिटी सर्व्हे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सभापती महोदय, डिसेंबर, 2005 पासून सिटी सर्व्हेचे प्रत्यक्ष काम सुरु झाले असून हे काम डिसेंबर, 2006 पर्यंत एका वर्षाच्या आत पूर्ण केले जाईल. सभापती महोदय, सन 2001 च्या सर्व्हेमध्ये 14542 अनधिकृत इमारती निदर्शनास आलेल्या आहेत. ड्यू प्रोसेस ऑफ लॉ च्या पध्दतीनुसार त्यांना नोटीसेस देण्यात आलेल्या असून पुढील कार्यवाही करण्यात येईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 13263 ....**

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अनधिकृत इमारती ठाणे व मुंबई महानगरपालिकेच्या दृष्टीने डोकेदुखीचे प्रकरण झालेले आहे. या अनधिकृत बांधकामास जे वॉर्ड ऑफिसर किंवा वरिष्ठ अधिकारी जबाबदार आहेत किंवा ज्यांच्या कार्यकक्षेत अशी अनधिकृत बांधकामे झाली आहेत, त्यांना त्या बांधकामासंदर्भात जबाबदार धरले जाईल, असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील दोन अधिवेशनामध्ये दिले होते. ठाणे महानगरपालिका असो, मिरा-भाईंदर महानगरपालिका असो, सगळ्या महानगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये झालेली अनधिकृत कामे निदर्शनास आणून देखील आजपर्यंत एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. तरी, माझा माननीय मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे की, सन 2001 किंवा 2002 च्या सर्वेक्षणानंतर ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या असतील, त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करणार का ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी आहे, त्यांनी कामामध्ये कुचराई केली असेल तर त्याची चौकशी होऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. या संदर्भात अनेक रिट अर्ज देखील दाखल झालेले आहेत. समित्यांच्या अहवालावरुनही अनधिकृत बांधकामे झाल्याचे आपल्याला दिसत आहे. आपण उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राचे नगर भूमापन करण्याचे काम डिसेंबर, 2005 पासून सुरु करण्यात आले आहे. " सभापती महोदय, हे महानगरपालिका क्षेत्राचे भूमापन आहे की, अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण ? हे अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण असेल तर ते आपण केव्हा पूर्ण करणार आहात ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या कामासाठी 49 आठवड्यांचा वेळ दिलेला आहे. या कामासंदर्भात चार एजन्सीज देखील नियुक्त केलेल्या आहेत. सभापती महोदय, काही शहरांमध्ये सिटी सर्व्हे झालेला नव्हता. तरी, सिटी सर्व्हेचे काम पूर्ण व्हावे या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. तरी, या संदर्भातील सगळी माहिती समोर आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चारकोप ( कांदिवली ) मध्ये गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने वितरित केलेल्या भूखंडावर सदनिका बांधकामाला सुरुवात झाल्याबाबत**

**(८) * १५७१५ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. विनायकराव मेटे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप ( कांदिवली ) येथील सेक्टर ८ मध्ये जागतिक बँक प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने वितरित केलेल्या भूखंडावर सदनिका बांधकामाला सुरुवात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणच्या भूखंडाच्या काही बांधकामाला म्हाडाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे, असल्यास, उपरोक्त स्थगिती उठविण्याबाबत राज्य शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) होय. मॅनग्रोव्हज पासून ५० मीटर अंतरावर असणाऱ्या भूखंडावरील बांधकामास मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.३२४६/२००४ मध्ये दि.६-१०-२००५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार म्हाडाने स्थगिती दिली आहे. मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देश प्रस्तुत योजनेसाठी शिथिल करण्याची विनंती न्यायालयास करण्याबाबत म्हाडास निदेश देण्यात आले आहेत.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत. )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT 14.25

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

**नवी मुंबईतील वधवा बिल्डरचा रद्द झालेला पामबीच रेसिडेन्सी प्रकल्प**

**(९) * १३६०० श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील "पामबीच" मार्गावर सिडकोने सीक्वीन सागरीका, सी व्ह्यू, अमेय, सिलिंक, विनायक या सहा गृह निर्माण संस्थांना भूखंडाचे वाटप केले होते, त्या भूखंडाचे एकत्रीकरण करुन वधवा बिल्डरचा पामबीच रेसिडेन्सी हा प्रकल्प उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला, हे खरे आहे काय,

(२) हा प्रकल्प रद्द बातल होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदर गृहनिर्माण संस्थांना वाटप करण्यात आलेले भूखंड एकत्र करुन त्यावर वधवा बिल्डरने पामबीच रेसिडेन्सी हा गृह प्रकल्प उभा करत असतांना सिडकोने आयोजित केलेल्या प्रॉपर्टी २००३ मालमत्ता विषयक प्रदर्शनास मांडण्यात येण्याची कारणे काय,

(४) फेब्रुवारी, २००४ मध्ये सिडकोच्या संचालकांच्या बैठकीत सिडकोचे माजी संचालक श्री. विजय चौगुले ह्यांनी सदर अनधिकृत गृह प्रकल्पास हरकत घेऊन सुध्दा त्याची चौकशी होण्यास विलंब लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी व्यक्तींविरुध्द काय कार्यवाही करण्यांत आली वा येत आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) हे खरे आहे.

(२) मे. वाधवा बिल्डर्स यांनी बोगस गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातुन बाजारभावापेक्षा कमी दराने भूखंड वाटप करुन घेतले, तसेच हे भूखंड वाटप प्रचलित नियमांना अनुसरुन झालेले नाही, अशी कारणे नमूद करुन मा. उच्च न्यायालयाने हे भूखंड वाटप रद्द केले.

(३) "पॉपर्टी-२००३" हे मलामत्ता विषयक प्रदर्शन सिडकोने आयोजित केलेले नव्हते तर नवी मुंबईतील विकासकांनी आयोजित केले होते. या प्रदर्शनात वाधवा बिल्डर्स यांच्या पामबिच रेसिडन्सी प्रकल्पाचा समावेश होता.

(४) हे खरे नाही.

(५) या भूखंड वाटपाशी संबंधीत अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पाळेकरवाडी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथील खारभूमी संरक्षक बंधाऱ्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याबाबत**

**(१०) * १६४४१ डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे** : सन्माननीय **खार जमीन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळेकरवाडी (देवगड, जि. सिंधुदुर्ग) खारभूमी संरक्षक बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे व मुळ आराखडा बदलून केल्याबाबतच्या अनेक तक्रारी पाळेकरवाडी खारभूमी विकास सहकारी सेवा सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधितांकडे केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) खारभूमी उपविभाग, तरळा यांचे कार्यालयातील पत्र जावक क्र. २७१/२००५ उपविभागीय अभियंता ह्यांचे कार्यालय संदर्भ ४/१४४४/२७१ दिनांक २६ एप्रिल, २००५ प्रमाणे पाळेकरवाडी बंधाऱ्याचे कामास दिनांक २९ मार्च, २००५ रोजी मंजूरी दिल्याचे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(३) सदर बंधाऱ्याचे कच्चे बांधकाम या भागातील ग्रामस्थांनी युरोपीयन आर्थिक समुदायाच्या मदतीने स्थानिक आपदग्रस्तांच्या सहाय्याने यापूर्वीच केली होती, हे खरे आहे काय,
(४) या कच्च्या बांधकामावरच ठेकेदाराने दगड टाकून जुजबी मजबूती करण्याचे काम करुन पूर्ण कामाचे पैसे घेतले व काम योग्य त्या दर्जाचे व नकाशाप्रमाणे न केल्याचे तक्रारीमध्ये नमुद केले आहे काय,
(५) याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, दोषी व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) नाही.
(२) नाही.
(३) अंशत: खरे आहे. लाभधारकांनी तात्पुरत्या स्वरुपाचा व अत्यल्प काटछेदाचा कच्चा शेतबांध पारंपारिक पध्दतीने बांधला होता. परंतु या बांधकामामध्ये खारभूमी यंत्रणा अथवा युरोपियन समुदायाचा सहभाग नव्हता.
(४) तक्रार नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / परीक्षेसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 14:30

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देतात )

**राज्यातील पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याबाबत**

**(११) * १३६३१ प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. विनायकराव मेटे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती कांता नलावडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११४२० ला दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुसंवर्धन विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालयात पशुधन विकास अधिकाऱ्यांची सुमारे ६२८ पदे रिक्त आहेत व राज्यात ५००० पेक्षा अधिक पदवीधर व पदव्युत्तर बेकार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त रहाण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरहू पदे लवकरात लवकर भरुन बेकार पशुवैद्यकांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. अनिस अहमद** : (१) होय.

(२) व (३) पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे ८५% नामनिर्देशन व १५% पदोन्नतीने भरण्यात येतात. नामनिर्देशनाने पदे भरण्याची बाब महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेत येत असल्याने सदर पदे भरण्यास विलंब होतो. पदोन्नतीने निम्नस्तरीय कर्मचाऱ्यांमधून पदे भरण्यात येतात. परंतु निम्न संवर्गात कर्मचारी उपलब्ध नसल्याने पदे रिक्त आहेत. गट अ मध्ये ३७६ पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १० फेब्रुवारी, २००६ रोजी जाहिरात प्रसिध्द झाली आहे. तसेच गट ब मध्ये ६० पशुधन विकास अधिकारी यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही चालू आहे. लोकसेवा आयोग व पदोन्नतीने पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे उपलब्ध झाल्यावर सदर रिक्त पदे भरण्यात येतील.

----------

**राज्यात बर्ड फ्ल्यु आजाराचा झालेला प्रादुर्भाव**

**(१२) * १६८४८ श्री. सुधाकर गणगणे , डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री. दिवाकर रावते , श्री. अनंत तरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) येथे बर्ड फ्ल्यु झाल्याने लक्षावधी कोंबड्या मारण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती ठिकाणी उपरोक्त रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे व किती जणांचा त्यात मृत्यु झाला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त रोगाचा मुकाबला करण्यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाचे प्रतिबंधक उपाय योजिले आहेत,

(४) असल्यास, मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना व ठार करण्यात आलेल्या कोंबड्यांच्या मालकांना शासनातर्फे किती आर्थिक मदत करण्यात आली वा येत आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री. अनिस अहमद यांच्याकरिता**: (१) होय.
(२) नवापूर जिल्हा नंदूरबार व जळगांव जिल्ह्यातील हातेड, ता.चोपडा, सावदा ता.रावेर, साळवे ता.धरणगांव मावळ, ता.यावल येथे बर्ड फ्ल्यू ची लागण पक्षामध्ये झालेली आहे, या रोगामुळे एकाही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही.
(३) बर्ड फ्ल्यु च्या उच्चाटनासाठी कृती आराखडा तयार केला असून या रोगाची लागण झालेल्या क्षेत्रापासून १० कि.मी. परिसरातील कोंबड्या अंडी, कुक्कुट खाद्य व विष्ठा बाहेर नेण्यास प्रतिबंध केलेला आहे व हे सर्व त्याच ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट केले जात आहे. तसेच राज्यातील सर्व कुक्कुट प्रक्षेत्रांची आठवड्यातून एक वेळ पाहणी करण्याचे निदेश पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच विक्रीसाठी जेव्हा फार्ममधून कोंबड्यांची वाहतूक होते तेव्हा त्याची तपासणी करुन त्या निरोगी असल्याचे प्रमाणपत्र देण्यासंबंधी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. पोल्ट्री फार्म चालकांच्या तसेच लोकाच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मंत्रालय नियंत्रण कक्षात दिवसरात्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) कुक्कुट प्रक्षेत्राच्या मालकांना नुकसान भरपाई म्हणून लेयरपक्षी रुपये ४०, ब्रायलर पक्षी रुपये ३० व १० आठवड्याच्या आतील पिलास रुपये १० याप्रमाणे प्रती पक्षी आर्थिक मदत देण्यात येत आहे. बर्ड फ्ल्यु ने अद्याप कोणीही व्यक्ती मृत झाली नसल्याने त्यासाठी आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

-----------

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देतात )

**दक्षिण मध्य मुंबईतील बोटावाला चाळीच्या पुनर्बांधणीबाबत**

**(१३) * १३६४५ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे : दिनांक १६ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २१ डिसेंबर, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक ९५७६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्य दक्षिण मुंबईतील रामभाऊ भोगले मार्गावरील बोटावाला चाळीतील भाडेकरुंना संक्रमण शिबीरात पाठवून चाळ पाडण्याची कार्यवाही सुरु झाली हे खरे आहे काय,
(२) असल्यास या चाळीची पुनर्बांधणी म्हाडातर्फे करण्यात येत असताना या चाळी पाडण्याची कार्यवाही सराह या खाजगी कंत्राटदाराकडून करण्याची कारणे काय आहेत,
(३) म्हाडाकडून या चाळीची पुनर्बांधणी करण्याची कार्यवाही केव्हा सुरु होणार आहे व त्याचा अंदाजित खर्च किती आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) व (२) बोटावाला ट्रस्टच्या मालकीच्या आहेत. इमारत क्र. २९९ अ अणि २९९ ब या दोन्ही धोकादायक इमारतीतील तळ मजले सोडून वरचे दोन मजले तोडण्यास बोटावाला ट्रस्टला त्यांच्या विनंतीनुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने परवानगी दिली आहे. सदर ट्रस्टने मजले पाडण्याचे काम सहार या खाजगी कंत्राटदारास दिले आहे.
(३) सदर इमारतीची पुनर्बांधणी म्हाडातर्फे करण्यात येणार असून, भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. प्रत्यक्ष जागेचा ताबा मिळाल्यानंतरच पुनर्बांधणीचे काम सुरु करता येईल. पुनर्बांधणी योजनेचा अंदाजित खर्च रु. ७,७८,४०,०००/- इतका आहे.


VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... १४:३०

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सोलापूर येथील म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांना भूखंडाची वाढीव रक्कम भरण्यासाठी नोटीसा दिल्याबाबत**

**(१४) * १४१०० श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. यशवंतराव गडाख :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील म्हाडा वसाहतीतील १,७८७ रहिवाशांना भुखंडाची वाढीव रक्कम भरण्याबाबत २५ डिसेंबर, २००५ चे दरम्यान नोटीसा दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटीसाबाबत या रहिवाश्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाल्याने सोलापूर येथील कार्यालयावर "म्हाडा" अन्याय विरोधी संघर्ष व विकास समितीद्वारे २८ जानेवारी, २००६ रोजी मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ज्यादा रक्कम भरुन न घेणेबाबत केलेली वा करण्यात आलेली कार्यवाही काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दयानंद मस्के, विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (१) व (२) होय.

(३),(४) व (५) चौकशी करण्यात येत आहे.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आग्राव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील जेटीचा उपयोग मच्छिमार व्यवसायिकांसाठी होत नसल्याबाबत**

**(१५) * १३८१८ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आग्राव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील बंदरातील जेटीचे काम माहे मार्च, २००५ रोजी पूर्ण झ ाले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जेटीचा उपयोग अद्याप मच्छिमार व्यवसायीकांसाठी होत नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) या बंदराचा उपयोग व्यवसायीक मच्छिमारांसाठी केंव्हा पासून सुरु करण्यात येणार आहे ?

**श्री. अनिस अहमद** : (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदर जेट्टीचा उपयोग स्थानिक मच्छिमार मार्च, २००५ पासून करीत आहेत.

----------

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देतात )

**दुग्धविकास विभागातील पर्यवेक्षक/पाळी व्यवस्थापक यांना कृषि अधिकारी (अराजपत्रित) यांच्या एवढे वेतन देण्याबाबत**

**(१६) * १५४६८ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. विनायकराव मेटे , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुग्धव्यवसाय विकास विभागातील पर्यवेक्षक/पाळी व्यवस्थापक हे कृषि अधिकारी (अराजपत्रित) या पदाबरोबर समतुल्य असल्याने न्यायालयीन निवाड्यानुसार उपरोक्त दोन्ही पदांसाठी समान वेतन देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊनही दुग्ध विभागातील अधिकाऱ्यांना फेब्रुवारी, २००६ पर्यंत समान वेतन दिले गेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय काळे व भोळे समितीने सदरहू वेतनश्रेणी देणेबाबत शिफारस करुनही शासनाकडे प्रदिर्घ कालावधीसाठी प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पर्यवेक्षकांना कृषि पर्यवेक्षकांप्रमाणेच वेतनश्रेणी लागू करणेबाबत शासन कोणती तात्काळ कार्यवाही करणार आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील,श्री. अनिस अहमद यांच्याकरिता**: (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) न्यायालयीन निर्णयानुसार दुग्धव्यवसाय विकास विभागातील दुग्धशाळा पर्यवेक्षक या पदाची अर्हता धारण करणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना कृषि पर्यवेक्षकांप्रमाणे दिनांक १.५.८५ पासून रु. ४२५-७६० दिनांक १.१.८६ पासून रु. १४००-२६०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे.

२९-०३-२००६ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) X-५
VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... १४:३०

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

-----------

**मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाने**
**केलेल्या ९ भूखंडाच्या लिलावाबाबत**

**(१७) * १३८९७ श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाने दिनांक ६ जानेवारी,२००६ रोजी वांद्रे-कुर्ला संकुलातील ९ भुखंडाचा लिलाव केला त्या विक्रीपोटी शासनाला १२०० कोटी रुपये मिळाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ९ भूखंड मिळून किती हजार चौरस मीटर जागेची विक्री झाली व एका चौरस मीटर जागेची साधारणत: काय भावाने विक्री केली,

(३) सदर ९ भूखंड खरेदी करणारे खरेदीदार कोण आहेत, त्यांना भूखंड खरेदी करतांना कोणकोणत्या अटी घालण्यात आल्या आहेत,

(४) सदर अटींचे पालन खरेदीदारांनी न केल्यास त्यांचा केलेला व्यवहार रद्दबातल ठरविण्यात येणार आहे काय,

(५) हा व्यवहार करतांना शासनाला यापेक्षा जास्त पैसे मिळाले असते काय ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) व (२) वांद्रे-कुर्ला संकुलातील ९ भूखंडाचे क्षेत्र सुमारे ४३९८४.४७ चौ.मी. असून सरासरी रुपयें १,३८,३६२ प्रति चौ.मिटर या दराने त्यांच्या विक्रीपोटी प्राधिकरणास रु. ११९० कोटी एवढी रक्कम मिळणार आहे.

(३) भूखंडदारांची नावे : १) इनाम फायनान्सीयल कन्सल्टंट, २) ग्रीनबर्ड डेव्हलपर्स प्रा.लि., ३) ग्रीनबर्ड डेव्हलपर्स प्रा.लि., श्रीराम वेसल स्क्रॅब प्रा.लि., श्री नमन डेव्हलपर्स लि., ४) टि.सी.जी. अर्बन इन्फ्रॉस्‌अ्रकचर होल्डींग प्रा.लि., ५) जेट एअरवेज (इंडिया)लि., ६) स्टारलाईट सिस्टीम्स्‌ प्रा.लि., ७) स्टारलाईट सिस्टीम्स्‌ प्रा.लि., ८) नमन बीकेसी का.ऑप.हौ.सो.लि. ९) श्री. नमन डेव्हलपर्स लि. अशी आहेत. या भूखंडधारकांना तीन महिन्याच्या आत रक्कम भरणे, ठरवून दिल्याप्रमाणे वापर करणे, कमीत कमी मुल्यापेक्षा अधिक मूल्य असणे या व इतर अटी घालण्यात आलेल्या आहे.

(४) निविदाकारांची निविदामधील अटींची पूर्तता केलेली असल्याने व्यवहार रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) जाहिरात देऊन, निविदा मागवून उच्चतम निविदा स्वीकारण्यात आल्याने यापेक्षा अधिक रक्कम मिळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देतात )

**सावनेर (जि. नागपूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात**
**पुरेसा औषध पुरवठा होत नसल्याबाबत**

**(१८) * १४७९० प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावनेर (जि. नागपूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पुरेसा औषध पुरवठा नसल्यामुळे जनावरांकरीता प्राथमिक उपचारासाठी लागणारी औषधे बाजारातून विकत घेवून दवाखान्यात जावे लागते अशा प्रकारच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत काय,

(२) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री. अनिस अहमद यांच्याकरिता**: (१) अशा प्रकारच्या लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मौजे सावनेर जिल्हा नागपूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पुरेसा औषध साठा उपलब्ध नाही ही बाब खरी असल्याकारणाने ही बाब खरी नाही असे चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. यासंदर्भात मंत्री महोदय खुलासा करीत काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील खुलासा करण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देतात )

**सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक २ वाजून ३३ मिनिटांनी २ वाजून ४८ मिनिटांपर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

( गोंधळ )

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृह 15 मिनिटांसाठी स्थगित करते.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 49 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

----

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर .... )

( गोंधळ )

**<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी</u>.**

**तालिका सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक 3.05 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

( यानंतर श्री. सरफरे .... एए 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशासंबंधी माननीय अर्थमंत्र्यांनी केलेले निवेदन**

**सभापती :** माननीय अर्थमंत्र्यांनी निवेदन करावे.

श्री. जयंत पाटील (अर्थमंत्री) : सभापती महोदय, सभागृहामध्ये संमत झालेल्या पुरवणी मागण्यांना माननीय राज्यपालांनी दिलेल्या मान्यतेबरोबर व विनियोजन विधेयकाच्या मान्यतेबरोबर राज्य शासनाला त्यांनी त्या संबंधीच्या नस्तीमध्ये काही सूचना केल्या. त्या केलेल्या सूचना माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे मी वाचून दाखवितो. " Approval is accorded for introduction of the Appropriation Bill for Supplementary Grants since both the Houses of the Legislature have approved the demand for Supplementary Grants to the tune of Rs.1041.90 crores.

I have taken note of the Commitment of the Government to allot an additional amount of Rs.150 crores to Vidarbha and Rs.50 crores to Konkan from the Contingency Fund.

Of the Supplementary Statement of Expenditure of Rs.1041.90 crores the following grants may be released.:-

Rs.100 crores to Tapi Irrigation Development Corporation.

Rs.100 crores to Marathawada Godawari Irrigation Development Corporation.

Rs.150 crores to MKVDC for land acquisition and rehabilitation.

Rs.149.20 crores for projects under AIBP, out of which Rs.70.12 crores will be allotted to Vidarbha Irrigation Development Corporation, Rs.42.30 crores to MKVDC, Rs.10.50 crores to Konkan Irrigation

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

Development Corporation and Rs.6.10 crores to Tapi Irrigation Development Corporation.

Rs.41.10 crores for Inter-State Irrigation Projects of Tillari and Dudhganga.

Rs.8 crores to Irrigation Department for Irrigation Projects in Vidarbha.

The remaining grants out of Rs.1041.90 crores shall not be released." त्यानंतर त्यांनी मराठवाडयाला ए.आय.बी.पी. साठी 20.18 कोटी देण्याचे कळविले आहे, परंतु ते पत्रामध्ये आलेले नाही. Mr. Chairman, Sir, it is further stated that: " Under Statutory Development Boards Scheme, it is mandatory for the State Government to seek approval of the Governor to the proposed Board-wise allocation of outlay in the Annual Plan every year before presentation of the Annual Budget. A similar exercise should be carried out in respect of Supplementary Demands before presentation of the same to the Legislature.

The distortions which have crept in to the plan allocation for the Irrigation Sector as a result of actual expenditure during the current year and the Supplementary Demands should be set right in the next Supplementary Demands as and when they are presented to the Legislature."

सही/-

( एस. एम. कृष्णा )

महाराष्ट्राचे राज्यपाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AA 3/-

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी नामदार अर्थमंत्र्यांचा आभारी आहे. माननीय राज्यपालांनी केलेल्या सूचना त्यांनी आता सभागृहामध्ये वाचून दाखविल्या आहेत. या सूचनांच्या प्रती माननीय सदस्यांना वितरीत करण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आजचे सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर येणाऱ्या सोमवारी सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल त्या दिवशी सर्व माननीय सदस्यांना या प्रती वितरीत करण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या निमित्ताने एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. कालपासून आम्ही या सदनामध्ये पहात आहोत की, आम्ही ज्या हक्कासाठी भांडत होतो त्यासाठीच आमची विनंती होती. परंतु त्याकरिता शासनाने आम्हाला कालपासून ठोकरले. आम्ही त्याकरीता आपणाकडे संरक्षण मागितले तरीही आपण आम्हाला संरक्षण दिले नाही हे सांगत असतांना मला दु:ख होत आहे. आणि आज सभागृहामध्ये वारंवार मागणी केल्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांनी माननीय राज्यपालांनी केलेल्या सूचना या ठिकाणी वाचून दाखविल्या. आमचे पहिल्यापासून हेच म्हणणे होते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे...... 15:30

Shri Madhukar Sarpotdar...

I would like to point out that whatever the directives have been issued by His Excellency, the Governor of Maharashtra, they are mandatory on the Government. They should be implemented and if at all, there are any changes in those directives, it should be disclosed before this august House. But, that was not done by the Government. The Government has preferred to keep quite on this issue. The Government always kept us in abeyance and the entire show was going on since last evening. Mr. Chairman, Sir, it is a very serious matter. Sir, my humble request to you, is that, before taking any business of the House, the Government should be asked to tender its apology for this development. It is necessary. Sir, this is my contention. Sir, this entire exercise was undertaken and developed by the Government of Maharashtra and particularly, now, the Hon. Minister for Finance of the State has disclosed all these facts before the House. After all, it is our right as the Member of this House to know the information and our rights should be safe guarded by you. Sir, our contention is that you should protect our rights and that is very much essential. Sir, this is my actual Point of Order on this issue.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मला नम्रतापूर्वक आपल्यासमोर सादर करावयाचे आहे की, सन्मानीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांचा टाईम लॅग बाबतचा महत्वाचा मुद्दा आहे. सन्माननीय राज्यपाल महोदयांनी परवा रात्री विनियोजन विधेयकाची नस्ती हे रिमार्क देऊन पाठविली, त्यानंतर आपण काल विनियोजन विधेयक मांडले. सन्माननीय सदस्यांना हे सांगणे आवश्यक आहे की, माननीय राज्यपालांनी पुरवणी मागणीला मान्यता दिलेली होती आणि विनियोजन विधेयकावर त्यांनी आपल्या सूचना केलेल्या होत्या. सभापती महोदय, 1 हजार कोटीच्या मागण्यांना मंत्रिमंडळाने मान्यता देऊन त्या मांडायच्या होत्या. त्यामध्ये काही डिस्टॉर्शन्स आहेत, म्हणून या ठिकाणी मत व्यक्त केले गेले असते. एखादी रक्कम कमी करणे ही बाब



SKK/ KGS/ MAP/

श्री.जयंत पाटील (पुढे सुरु.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहासमोर वाचून याबाबतची अनपॉप्युलॅरीटी कोणाकडे देण्याची आवश्यकता नव्हती, म्हणून मी काल मुद्दाम ते रिमार्कस् वाचले नाहीत. काल संध्याकाळी माननीय राज्यपाल महोदयांकडे मी पुन्हा वेळ मागितला. त्यांना भेटून मला ब्रीफ करायचे होते की,आपण जे रिमार्कस् लिहिलेले आहेत त्याबाबत विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये सदस्यांकडून मागणी होत आहे. कारण शेवटी त्यांच्या आणि आमच्या मधला तो व्यवहार आहे... त्यांनी दिलेल्या डायरेक्टीव्हजच्या बाहेर जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यांनी जे डायरेक्टीव्हज दिले, त्याच्या अंतर्गत राहूनच ही कार्यवाही करणार होतो. त्यामुळे त्यांच्या डायरेक्टीव्हजचे व्हायोलेशन करण्याचा प्रश्न नाही. पुरवणी मागण्या यापूर्वी राज्यपालांकडे पाठवत नव्हतो. त्यांनी आता सांगितले आहे की, येथून पुढे सप्लीमेंटरी डिमांडसुही डिस्टीब्यूशन करण्यासाठी माझ्याकडे आल्या पाहिजेत. त्यामुळे आता आपण 1 हजार कोटीची डिमांड मांडली. त्यांनी 400, 500, 700, 800 कोटी रुपयाच्या सूचना केल्या. त्या सभागृहात सांगितल्या तर बाहेर असे मत तयार होईल की, राज्यपालांनी डिमांड कर्टल केलेल्या आहेत, असे होऊ नये, याची काळजी घेण्याचा कालचा माझा प्रयत्न होता. काल माझी त्यांच्याशी भेट झाली असती तर त्यांना मी अवगत केले असते. जाणूनबुजून नव्हे तर मेहरबान राज्यपालांना कल्पना देऊन हे मांडावे, अशी माझी त्या मागची कल्पना होती. सभापती महोदय, यावर चर्चा करणे योग्य नाही, अशी माझी आजही सभागृहाला विनंती आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती देण्याचा आग्रह केला ती माहिती मी दिलेली आहे. विधानसभा सभागृहामध्येही हीच माहिती दिलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांची जी अपेक्षा होती ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहामध्ये माहिती सादर केलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार :मी वेळेबद्दल बोललो. काल सकाळपर्यन्त हा विषय उपस्थित केला जात होता, परंतु माहिती दिली जात नव्हती.

**सभापती** : मला असे वाटते की, ही चर्चा आता येथचे थांबवू या. सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यामध्ये हेही आले की, माझ्याकडून देखील याबाबतीत न्याय मिळालेला नाही.पाण माझा तसा उद्देश नव्हता, मी असे म्हणत होतो की,शासनाकडून ही माहिती माझ्याकडे आली तर जरुर मी या.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**सभापती** (पुढे सुरु....

दृष्टीने सांगेन. याबाबतीमध्ये म्हणजे राज्यपालांचे एखादे पत्र किंवा अन्य गोष्टींवर मी भाष्य करणे बरोबर नाही, असे मला वाटले व तसे मी कालही सांगितले होते.

यानंतर आजच्या कामकाज पत्रिकेवरील कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे ही बाब आपण आता घेण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गडचिरोली जिल्ह्याप्रमाणे विदर्भातील यवतमाळ व बुलढाणा या दोन जिल्ह्यात येणाऱ्या उद्योगांना वगळण्याबाबत" या विषयावरील डॉ. एन. पी. हिराणी, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते आणि जी. एल. ऐनापूरे, वि. प. स. यांच्या दिनांक 21 जुलै, 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 5605 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस - येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा ( औरंगाबाद ) सन 2004-05 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2004-05 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दुसऱ्या महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल व त्यावरील कार्यवाहीचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल व त्यावरील कार्यवाहीचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MHM/ MAP

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आजच्या नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्या सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात येतील. तसेच आज घेण्यात यावयाची नियम 93 च्या सूचनेसबंधीची निवेदने सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात येतील.

----

**पृ.शी./मु.शी.** : लक्षवेधी सूचना

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात येतील. तसेच 3 तारखेच्या ज्या लक्षवेधी सूचना आहेत त्या वेगळ्या येतील.

----

**पृ.शी./मु.शी.** : विशेष उल्लेख

**सभापती** : आजचे जे विशेष उल्लेख आहेत ते सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात येतील.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

**L.A. BILL NO.XXX OF 2006.**

**(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2006-2007.)**

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 30 - राज्याच्या एकत्रित निधीतून 2006-2007 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राचे राज्यपाल यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी , परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MHM/ MAP

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत इतर जी दोन शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत ती सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजीच्या कामकाजामध्ये दाखविण्यात येतील

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 40 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 च्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही